# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**बुधवार, दिनांक २६ जून, २०१९ / आषाढ ५, १९४१ ( शके )**

**(१) उद्योग व खनिकर्म मंत्री**
**(२) उर्जा, नवीन व नवीकरणीय उर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री**
**(३) पणन व वस्त्रोद्योग मंत्री**
**(४) सहकार मंत्री**
**(५) सामाजिक न्याय मंत्री**
**(६) आदिवासी विकास मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५३**

---

### वाशिम जिल्हयातील कृषी उत्पन्न बाजार समितीमधील गैरव्यवहाराबाबत

**(१) * १४०३४४ श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशीम जिल्हयातील कृषी उत्पन्न बाजार समितीवर प्रशासक मंडळाच्या नेमणुकीनंतर मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाल्याची तक्रार जिल्हा उपनिबंधकांकडे सादर करूनही अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी श्री.दामू अण्णा गोटे यांनी लेखी तक्रारीद्वारे निष्पक्ष चौकशीची मागणी सहाय्यक निबंधक, अमरावती यांच्याकडे दिनांक २ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर लेखी तक्रारीनुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय.

वाशिम जिल्हातील कृषी उत्पन्न बाजार समितीवर प्रशासक मंडळ नेमणूकीनंतर झालेल्या गैरप्रकार झाल्याबाबत श्री.दामोदर यशवंत गोटे यांनी दि.१३.११.२०१८ रोजी जिल्हा उपनिबंधक यांना पत्र पाठविले असून त्याबाबत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वाशिम यांनी सहायक निबंधक, सहकारी संस्था, वाशिम यांना चौकशी करणेबाबत कळविले होते. परंतु बाजार समितीने दप्तर उपलब्ध करून न दिल्यामुळे बाजार समितीच्या सचिवावर निलंबनाची कार्यवाही करण्याबाबत बाजार समितीला दि.०९.०१.२०१८ रोजी निर्देश देण्यात आलेले होते. त्यास बाजार समितीने मा.उच्च न्यायालयात याचिका क्र.५७५२/२०१८ अन्वये आव्हान दिलेले असून प्रकरण सद्यस्थितीत न्यायप्रविष्ठ आहे.
(२) होय.
(३) व (४) श्री.दामू अण्णा गोटे यांनी लेखी निवेदन सहाय्यक निबंधक यांच्याकडे प्राप्त झाल्यामुळे शासनाकडून त्यांच्या लेखी तक्रारीवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. परंतु, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वाशिम यांच्या स्तरावर कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

-----------------

## मौजे उटंबर, उबरशेत ग्रामपंचायत, पो.केळशी (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथे अनधिकृतपणे उत्खननाचे काम सुरु असल्याबाबत

**(२) * १३६२५७ श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे उटंबर, उबरशेत ग्रामपंचायत, पो.केळशी (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील १००० एकर जागेमध्ये अनधिकृतपणे उत्खननाचे काम सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी उत्खनन केल्यामुळे लाल मातीचा प्रादुर्भाव होऊन आंबा मोहर खराब होऊन बागायतदारांचे नुकसान झाले असून, २०० ते ३०० फुट खोल उत्खनन करण्यात आल्याने बाजुच्या गावातील पाणीही नाहीसे झाल्याने सन २०१७ मध्ये जिल्हाधिकारी, तहसिलदार यांच्यासमोर केळशी, ता.दापोली, जि.रत्नागिरी येथे झालेल्या सुनावणीत ग्रामस्थांनी एकमताने या उत्खनन्नास विरोध केला, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, सदर जमिनीवर उत्खननाचे काम कोणत्या कंपनीस देण्यात आले असून, खोल उत्खनन करण्यासाठी किती क्षेत्रफळ देण्यात आले आहे,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अनधिकृतपणे होत असलेले उत्खनन तात्काळ थांबविण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.
(२) उंबरशेत खनिपट्टा हा वरकस पड जमिनित असून त्या ठिकाणी बॉक्साईट उत्खननाचे ३ ते ४ मिटर खोल उत्खनन करण्यात आल्याचे दिसून येते. सदर खाणपट्टयात आंबा व काजू झांडाच्या बागा नसून तूरळक प्रमाणात झाडे लावलेली दिसून येतात व त्यावर धूळ उडू नये म्हणून कंपनीकडून खबरदारी घेतली जाते असे अप्पर जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी कळविले आहे. तसेच तहसिलदार दापोली यांचे अहवालावरुन गावात उत्खननामुळे पाणी टंचाई उद्‌भवल्याचे दिसून येत नाही. सदर खाणपट्टयात भारतीय खाण ब्युरो यांनी मंजूर केलेल्या खाणकाम योजनेनूसार काम केले जात आहे असे अप्पर जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्या अहवालावरुन दिसून येते.

मात्र दिनांक ०७.१०.२०१६ रोजी मौजे केळशी येथे पर्यावरणविषय जनसुनावणीच्यावेळी ग्रामस्थांनी विरोध केला असल्याचे तहसिलदार व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांच्या अहवालात नमूद असल्याचे अप्पर जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी कळविले आहे.
(३) दापोली तालुक्यातील मौजे-उंबरशेत येथील ९९.८६.१९ हे. आर क्षेत्रावर २० वर्षासाठी मे.आशापुरा माईनकेम लि. मुंबई यांना बॉक्साईट या खनिजासाठी दिनांक २१.१२.२००४ च्या आदेशान्वये खाणपट्टा मंजूर करण्यात आलेला आहे.

तसेच सदर खनिपट्टयाकरिता केंद्र शासनाच्या वन व पर्यावरण मंत्रालयाने ना-हरकत दाखला दिला आहे.

मौजे उटंबर येथील ४५.५४.४० हे. आर. क्षेत्रावर ३० वर्षाकरीता मे. आशापुरा माईनकेम लि. मुंबई यांना बॉक्साईट या खनिजासाठी दिनांक २१.१२.२००४ च्या आदेशान्वये खाणपट्टा मंजूर करण्यात आलेला आहे. तथापी, सद्यस्थितीमध्ये पर्यावरण विषयक अनुमती नसल्याने खाण कामास परवानगी नसल्याने उत्खनन करण्यात येत नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बोर्डी (जि.पालघर) येथील चिकू महोत्सवातील आयोजकांनी केलेला गैरव्यवहार

**(३) * १४१०६० श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोर्डी (जि.पालघर) येथील चिकू महोत्सवाकरीता आयोजकांनी त्यांच्या फायद्याकरीता आदिवासी विकास विभागाकडून २५ लाख रुपयांचे अनुदान घेऊन गैरव्यवहार केल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी तसेच आदिवासी समाज संघटनांनी दिनांक ३१ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चिकू महोत्सव आयोजित करणाऱ्या संस्थां नोंदणीकृत आहेत काय तसेच संस्थेचे स्वरुप काय आहे व त्यात सदस्य म्हणून आदिवासींचा समावेश करण्यात आला आहे काय, असल्यास सदर संस्थेत किती आदिवासी सदस्य आहेत,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर चिकू महोत्सवाकरीता स्थानिकांना स्टॉल लावण्यास ५०% राखीव जागा देण्यास व कमी दर ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे,

(४) तसेच सदर गैरव्यवहारात दोषी आढळून आलेल्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) हे खरे आहे.

(२) चिकू महोत्सवाचे आयोजन करणारी संस्था नोंदणीकृत असून सदर संस्थेमध्ये आदिवासी सदस्यांचे प्रतिनिधित्व नाही.

(३) जिल्हाधिकारी, पालघर यांच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने रुरल एन्ट्रपिनर्स वेलफेयर फाऊंडेशन या संस्थेने बोर्डी येथे आयोजित केलेल्या चिकू महोत्सवामध्ये आदिवासी समुदायाच्या सहभागाबाबत रु.२४.०० लक्ष इतकी रक्कम विशेष बाब म्हणून मंजूर करण्यात आली होती. परंतू त्याबाबत वेगवेगळ्या संघटनांकडून तक्रारी करण्यात आल्याने सदर प्रकरणाची एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, डहाणू, जि.पालघर कार्यालयाकडून स्थापन करण्यात आलेल्या त्रिस्तरीय समितीमार्फत चौकशी करण्यात आलेली आहे. त्यानूसार चिकू महोत्सवामध्ये ५८ स्टॉल प्रकल्प कार्यालय, डहाणूकरिता उपलब्ध करुन देण्यात आले होते. मात्र त्यापैकी फक्त ३७ स्टॉलकरिता आदिवासी लाभार्थ्यांची नोंदणी होऊ शकली. सबब केवळ ३७ स्टॉलचे, नृत्यसादरिकरणाचे व भोजन तसेच निवासासाठीचे रु.५.००/- लक्ष इतकी रक्कम आयोजकांना अदा करण्यात आली. सदर संस्थेस रकमेचे अतिप्रदान करण्यात आलेले नाही. त्यामुळे सदर प्रकरणी गैरव्यवहार झालेला नसल्याचे निदर्शनास येते.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धायरी (ता.हवेली, जि.पुणे) येथे ग्राहकांच्या माध्यमातून संगनमताने वीज चोरी होत असल्याबाबत

**(४) * १३९०७५ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धायरी (ता.हवेली, जि.पुणे) येथे कालव्यातून पाणी चोरी करण्यासाठी वीजेचा गैरवापर केला जात असल्याचे माहे एप्रिल, २०१९ च्या दुसऱ्या आठवडयात वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीजेचा गैरवापर करुन पाणी आणि वीज चोरी करणाऱ्या टँकर माफीयांवर कोणतीही कारवाई करण्यात आली नसून संबंधित वीज मीटर मालकाला गत दहा वर्षापासून मिटरबिल पाठविण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, तसेच वीज देयक आकारणी संदर्भातील वीज मीटर रजिस्टर इत्यादि पुरावे नष्ट करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास वीज महावितरण अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या संगनमताने वीज चोरी करणाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे,
(४) असल्यास, धायरी येथील टँकर लॉबीला कालव्यातील पाण्यासाठी लागणारी वीज जोडणी अपुऱ्या कागदपत्रांच्या आधारे देऊन वीजचोरी मध्ये संबंधित विभागाचे अधिकारी सहकार्य करीत असल्याबाबत महावितरण कार्यालयाकडे वांरवार तक्रार करुनसुद्धा याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी संबधितांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) महावितरण कंपनीच्या पुणे परिमंडळांतर्गत असलेल्या रास्तापेठ मंडळामध्ये धायरी (ता.हवेली, जि.पुणे) येथील दोन ग्राहक अनधिकृतरित्या वीज वापर करीत असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये कंपनीच्या निदर्शनास आले आहे.
(२) हे खरे नाही. तथापि सदर ग्राहकांस महावितरण कंपनीमार्फत नियमित वीज बिल देण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) उपरोक्त वीज चोरी प्रकरणी महावितरण कंपनीच्या भरारी पथकाने ग्राहक श्री. राजाभाऊ राघू रायकर यांच्यावर वीज चोरीचा गुन्हा दाखल केला असून मा. न्यायालयाच्या आदेशानुसार त्यांनी रु.९,१०,८५०/- इतक्या रक्कमेचा भरणा महावितरण कंपनीकडे केला आहे. तसेच ग्राहक श्री. अतुल दत्तात्रय चाकणकर यांच्यावर विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १३५ (१) (ई) नुसार कार्यवाही केली असता रु.४,९३,४९०/- इतक्या रकमेच्या वीज देयकाचा व रु.४०,०००/- इतक्या तडजोड रकमेचा भरणा महावितरण कंपनीकडे केला आहे. तसेच महावितरणचे संबंधित शाखा अभियंता व तंत्रज्ञ यांच्याविरुध्द नियमानुसार शिस्तभंगाची सुरु करण्यात आली आहे.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हयातील शिवाजीराव भोसले सहकारी बँकेतील आर्थिक गैरव्यवहाराबाबत

**(५) * १४११४३ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील शिवाजीराव भोसले सहकारी बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करुन प्रशासकाची नियुक्ती करण्यात यावी अशी मागणी पुणेकर नागरी कृती समितीने सहकार आयुक्त, पुणे यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी धनादेश न वटल्याप्रकरणी संचालकांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत व त्यांच्याकडुन रक्कम वसुल करुन ती ठेवीदारांना देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी रिझर्व्ह बँकेच्या निर्णयानुसार शिवाजीराव भोसले सहकारी बँकेतील ठेवीदारांना केवळ १ हजार रुपये मिळणार आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संचालक मंडळ बरखास्त करून प्रशासक नेमण्याबाबत तसेच बँकेतील आर्थिक गैरव्यवहारातील दोषी संचालकांवर जबाबदारी निश्चित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) व (२) होय.

(३) सदर बँकेस रिझर्व बँकेने बँकींग रेग्यूलेशन ॲक्ट, १९४९ च्या कलम ३६ नुसार दिनांक २५.०४.२०१९ च्या पत्रान्वये व कलम ३५ अ नुसार दिनांक ०४.०५.२०१९ च्या पत्रान्वये निर्बंध लादले आहेत. सदर निर्बंधानुसार प्रत्येक ठेवीदाराला रु.१०००/- पेक्षा जास्त रक्कम काढता येणार नाही.

(४) पुणेकर कृती समितीने दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने सहकार आयुक्तांनी बँकेच्या सन २०१२-१३ ते २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालाची छाननी करुन स्वयंस्पष्ट अहवाल सादर करण्याच्या सूचना दिनांक १२.०४.२०१९ च्या पत्रान्वये दिल्या आहेत. सन २०१६-१७ या कालावधीच्या चाचणी लेखापरिक्षण अहवाल व त्यावरील विशेष लेखापरिक्षण अहवालामध्ये आढळून आलेल्या आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित करण्यासाठी अधिनियमाच्या कलम ८८ (१) अन्वये श्री.आनंद कटके, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे यांची दिनांक ०४.०९.२०१८ च्या आदेशान्वये प्राधिकृत करण्यात आले असून चौकशीची पुढील कार्यवाही सुरु आहे.

वरील चाचणी लेखापरिक्षणात आढळून आलेल्या आर्थिक अनियमिततेच्या अनुषंगाने संबंधितांवर दिनांक १५.०३.२०१९ रोजी शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## श्रीगोंदा (जि.अहमदनगर) येथील जिल्हा सहकारी बँकेत कर्जवाटपात झालेला गैरव्यवहार

**(६) * १४१८७० श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा (जि.अहमदनगर) येथील जिल्हा सहकारी बँकेत कर्जवाटप करतांना २ कोटी ४० लाख रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची बाब निदर्शनास आल्यानंतर सहाय्यक निबंधकांनी २ सचिवांना निलंबित केले असून देखील जिल्हा सहकारी बँकेच्या अधिकाऱ्यांविरुद्ध अद्यापही कारवाई करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी उक्त अधिकाऱ्यांविरुद्ध माहे फेब्रुवारी, २०१९ पासून चौकशी सुरु असून चौकशी अद्याप पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी त्वरीत पुर्ण करुन त्यांचेविरुद्ध कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) व (२) नाही.

अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., अहमदनगर या बँकेच्या अंतर्गत तपासणीमध्ये श्रीगोंदा शाखेतील संलग्न पेडगांव, चोराचीवाडी, वेळू, चिखलठाणवाडी, जानाई पेडगांव व गहिणीनाथ अंधोरेवाडी प्राथमिक विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादीत या सेवा सहकारी संस्थांच्या बँक कर्ज वाटपामध्ये गैरव्यवहार झालेला आहे.

बँकेचे तत्कालीन अधिकारी श्री.एस.सी.मोटे, शाखा इन्सपेक्टर, श्रीगोंदा यांना सदर कामकाजातून मुक्त करून त्यांची बँकेची शाखा श्रीगोंदा येथून शाखा टाकळी कडेवळी येथे बदली करण्यात आलेली आहे. श्री. मोटे यांच्यावर प्रथम प्राप्त अहवालानूसार कर्जवाटपातील गैरव्यवहाराबाबत बँकेमार्फत अंतर्गत खातेनिहाय चौकशीकामी आरोपपत्र दाखल केलेले असून आजअखेर दि.२७/०७/२०१८, दि.०४/०८/२०१८, दि.०९/०१/२०१९, दि.०३/०५/२०१९, दि.२७/०५/२०१९ व दि.३०/०५/२०१९ या तारखांना सूनावणी झालेली असून चौकशीची कार्यवाही सुरु आहे. श्री.मोटे यांचेवरील अंतर्गत खातेनिहाय चौकशी कामकाज पूर्ण झाल्यानंतर चौकशी अहवालानूसार बँकेमार्फत उचित कार्यवाही केली जाईल.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कृषी उत्पन्न बाजार समित्यांना ५ टक्के खर्च अपंगांसाठी करणे बंधनकारक करण्याबाबत

**(७) * १४१९२९ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.मोहन फड (पाथरी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन १९९५ च्या अपंग पुनर्वसन कायद्यानुसार ५ टक्के निधी अपंगांसाठी खर्च करणे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ५ कोटी रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न असणाऱ्या कृषी उत्पन्न बाजार समित्यांना ५ टक्के खर्च अपंगासाठी करणे बंधनकारक करावे अशी मागणी लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री पणन यांचेकडे दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) नाही.
(२) होय.
(३) ५ कोटी पेक्षा अधिक उत्पन्न असणाऱ्या कृषी उत्पन्न बाजार समित्यांना ५ टक्के खर्च अपंगासाठी करणे बंधनकारक करावे अशा मागणीच्या अनुषंगाने पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून अहवाल मागविण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विदर्भातील मुकबधीर, अंध, मतिमंद व अस्थिव्यंग प्रवर्गातील विद्यार्थ्यांना माध्यमिक शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(८) * १४०९४१ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भातील मुकबधीर, अंध, मतिमंद व अस्थिव्यंग प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षणानंतर माध्यमिक शिक्षणाची सोय उपलब्ध नसल्याची बाब माहे डिसेंबर २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विदर्भात मुकबधीर विद्यार्थ्यांसाठी वर्ग १ ली ते ७ वी च्या जवळपास ३० शाळा असुन त्यांनतरच्या माध्यमिक शिक्षणाची कोणतीही सुविधा उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुकबधीर, अंध, मतिमंद व अस्थिव्यंग प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता विदर्भात माध्यमिक शिक्षणाच्या पुरेशा सुविधा उपलब्ध नसल्यामुळे त्यांचा नोकरीत असलेल्या ५ टक्के आरक्षणावर बोगस अपंग तयार होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विदर्भातील अपंगाना ५ टक्के आरक्षणाला न्याय मिळण्याच्या दृष्टीने त्यांच्याकरीता प्राथमिक शिक्षणानंतर माध्यमिक शिक्षणांची सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१), (२) व (३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पारोळा (जि.जळगाव) तालुक्यातील मुख्य बाजारपेठेतील दुकानांना लागलेली आग

**(९) * १३६८५५ डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारोळा (जि.जळगांव) तालुक्यातील मुख्य बाजार पेठेत शॉर्ट सर्किट्मुळे दुकानांना आग लागली असल्याचे दिनांक २० मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने सदर घटनेस जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करुन आगीमुळे दुकानांचे नुकसान झालेल्या व्यापाऱ्यांना भरपाई देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) विद्युत निरीक्षक, जळगांव यांनी सदर प्रकरणाची चौकशी केली असून "सदर घटना स्थळी आगीसंबंधी कोणताही विद्युत विषयक तांत्रिक पुरावा आढळून न आल्याने आगीचे निश्चित कारण सांगता येत नाही" असा अहवाल दिला आहे. त्यामुळे नुकसान भरपाई देण्याची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रेंगेपार शेतशिवारात (जि.भंडारा) उच्चदाब वाहिनी जवळीळ वृक्ष छाटणी करताना वाहन चालकाचा झालेला मृत्यू

**(१०) * १३५४८० डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेंगेपार शेतशिवारात (जि.भंडारा) उच्चदाब वाहिनी जवळील वृक्ष तोडण्यास सांगितल्याने पारेषण विभागाच्या हलगर्जीपणामुळे श्री.राजेश मेश्राम या वाहन चालकाचा मृत्यु झाल्याची बाब माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने वृक्ष छाटणी चे आदेश देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच, शासनाने सदर मृत कर्मचाऱ्याच्या नातेवाईकांना नुकसानभरपाई अदा करण्यासंदर्भात व वारसास नोकरीत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) दिनांक १८.०४.२०१९ रोजी मौज रेंगेपार, ता.तुमसर, जिल्हा भंडारा येथील शेतशिवारामध्ये श्री.राजेश मोतिराम मेश्राम, महापारेषण कंपनीचे कंत्राटी वाहन चालक हे २२० के.व्ही. कोराडी-कौलेवाडा अति उच्च दाब वाहिनीच्या मनोरा क्र.३४१ ते ३४३ च्या सानिध्यात आल्यामुळे वीजेचा शॉक लागून त्यांचा मृत्यू झाला.

(२) विद्युत निरीक्षक, भंडारा यांच्या अहवालानुसार महापारेषण कंपनीने २२० के.व्ही. कोराडी-कौलेवाडा अति उच्च दाब वीजवाहिनी जवळील झाडे कापण्यासाठी परमिट न घेतल्यामुळे सदर वीज वाहिनी विद्युत भारीत होती. श्री.मेश्राम हे इतर तंत्रज्ञानाना कोणतीही पूर्व सूचना न देता सदर वीज वाहिनी जवळील कडूनिंबाच्या झाडावर चढले असता झाडा जवळील विद्युत भारीत २२० के.व्ही कोराडी'कवलेवाडा वीजवाहिनीच्या संवाहाकाशी झाडाच्या फांदीचा स्पर्श होऊन त्यांना वीजेचा शॉक लागला व त्यांचा मृत्यू झाला.

सदर अपघाताबाबत अतिरिक्त कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्या., उपविभाग माडगी, यांनी वीजवाहिनी जवळील झाडे कापण्यासाठी परमिट न घेता कामे करुन घेतल्याबाबत त्यांना कारणे दाखवा नोटीस विद्युत निरीक्षक,भंडारा यांनी बजावली आहे. तसेच सदर अपघाताबाबत पोलीस स्टेशन सिहोरा येथे दिनांक १९.०४.२०१९ रोजी मर्ग क्र. १०/२०१९ कलम १७४ जा.फौ. ची नोंद करण्यात आली असून चौकशी सुरु आहे.

(३) महापारेषण कंपनीकडून मृतक श्री.राजेश मोतीराम मेश्राम यांच्या परिवारास आर्थिक मदत म्हणून रुपये २ लक्ष चा धनादेश दिनांक १६.०५.२०१९ रोजी देण्यात आला आहे. महापारेषण कंपनीच्या नियमानुसार वारसास नोकरी देण्यात येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे घास (ता.वसई, जि.पालघर) येथील गावात वीजेच्या धक्क्याने महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्याचा झालेला मृत्यु

**(११) * १४०२७० श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे घास (ता.वसई, जि.पालघर) येथे वीजेची तुटलेली तार जोडण्यासाठी वीजखांबावर चढलेल्या विद्युत विभागातील कर्मचाऱ्याचा वीजेचा तीव्र धक्का लागुन दिनांक २५ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय कर्तव्यावर असताना अपघातामध्ये मृत्युमुखी पडलेल्या कर्मचाऱ्याच्या वारसाला नुकसान भरपाई अदा करुन त्याच्या पत्नीस वारसा हक्काने नोकरीत सामावून घेण्याची मागणी राज्यसभा सदस्य यांनी दिनांक १३ नोव्हेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.ऊर्जामंत्री यांचेकडे केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन सदर मृत कर्मचाऱ्याच्या नातेवाईकांना नुकसानभरपाई अदा करण्यासंदर्भात तसेच वारसास नोकरीत सामावून घेण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे. महावितरण कंपनीच्या वसई मंडळांतर्गत विरार विभागातील नालासोपारा उपविभागात कार्यरत असणारे वरीष्ठ तंत्रज्ञ हे कर्मचारी टाकीपाड, घासरोड, वसई येथे लघुदाब उपरी तारमार्ग खांबावर चढून न्यूट्रलची तार दुरुस्त करताना वीजेचा धक्का बसून ते खांबावरुन खाली पडल्याने प्राणांतिक अपघात झाला.

(२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणाची विद्युत निरीक्षक, निरिक्षण विभाग क्र.१, ठाणे यांनी चौकशी केली असून, सदर अपघातास महावितरण कंपनी जबाबदार असल्याचे आढळून आल्याने मृत कर्मचाऱ्याच्या वारसास नुकसान भरपाई देण्याबाबत महावितरण कंपनीस दिनांक १.१.२०१९ च्या पत्रान्वये कळविण्यात आले. त्यास अनुसरुन महावितरण कंपनीने सदर कर्मचाऱ्याच्या वारसास कामगार नुकसान भरपाई व इतर अनुज्ञेय लाभ मिळून एकूण रु. २७,५९,४०४/- अदा केले असून भविष्य निर्वाह निधी अदा करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. तसेच त्यांच्या वारसास महावितरण परिमंडळ कार्यालय, कल्याण यांच्या जेष्ठता यादीनुसार अनुकंपा तत्वावर कंपनीच्या सेवेत सामावून घेण्याच्या प्रस्तावावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## मौजे चिखलोली (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथे शासकीय निवासी शाळा उभारण्याबाबत

**(१२) * १३९१८४ डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे चिखलोली (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथील सर्वे नं.६८ मधील जागेवर अनूसचित जाती व नवबौद्ध घटकातील २०० मुलांसाठी शासकीय निवासी शाळा उभारण्याच्या प्रस्तावास शासनाने मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवासी शाळेच्या इमारतीकरीता आवश्यक असलेले २०० विद्यार्थी क्षमतेसाठी नकाशे व अंदाजपत्रके तयार करुन फेरसादर करण्याबाबत सामाजिक न्याय विभाग यांनी दिनांक १३ नोव्हेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास समाज कल्याण आयुक्त यांना सूचना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी ६ महिन्यांचा कालावधी उलटून देखील अद्यापपर्यंत उक्त ठिकाणी इमारत उभारण्याबाबत समाज कल्याण विभागामार्फत कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सत्वर चौकशी करुन उक्त ठिकाणी अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील २०० मुलांसाठी शासकीय निवासी शाळा उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) व (२) होय, हे खरे आहे

(३) व (४) मौजे चिखलोली (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथील सर्वे नं.६८ मधील जागेवर अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील २०० विद्यार्थी क्षमता असलेले बांधकामाचे नकाशे प्राप्त झाले असून ते सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तांत्रिक बाबींची छाननीकरीता सादर करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) येथील औद्योगिक वसाहत परिसरातील अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत

**(१३) * १३५०५९ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) येथील औद्योगिक विकास महामंडळाकडे अतिक्रमण विरोधात स्वतंत्र यंत्रणाच नसल्यामुळे उक्त औद्योगिक वसाहतीमध्ये अतिक्रमणाच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ होत असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत २० वर्षामध्ये अतिक्रमणाविरोधात तात्पुरत्या स्वरूपात धडक मोहिम हाती घेवूनही सुध्दा ठोस धोरणा अभावी अतिक्रमण दूर करण्यास अपयश आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी गत तीन वर्षात १५ ते २० वेळा जेसीबी, मजूर आणि पोलीस बंदोबस्तात कारवाई करूनसुध्दा अतिक्रमणे न हटल्यामुळे औद्योगिक विकास महामंडळाचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून उक्त औद्योगिक वसाहतीतील अतिक्रमण विरोधात स्वतंत्र यंत्रणा उभारुन अतिक्रमणे हटविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई** : (१), (२), (३) व (४) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळा मार्फत तळोजा औद्योगिक क्षेत्रात होणारे अतिक्रमण निष्कासीत करण्याची मोहिम वेळोवेळी हाती घेतल्यामुळे मोकळ्या जागेवरील रस्त्याच्या बाजूस झालेले अतिक्रमण तसेच तळोजा फिडर रोड वरील रस्त्याच्या बाजूस झालेले अतिक्रमण निष्कासीत करण्यात आले आहे. त्यामुळे अतिक्रमणाच्या संख्येत वाढ झालेली नाही. तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे अतिक्रमण विरोधी पथक निर्माण करण्यासंबंधीचा प्रस्ताव विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील ७ औष्णिक वीज प्रकल्पांचे आर्युमान संपुष्टात आल्याबाबत

**(१४) * १३८६३० श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १४७० मेगावॅटच्या ७ औष्णिक वीज प्रकल्प संचांची आणि ४३२ मेगावॅटच्या चार वीज संचांचे आर्युमान संपुष्टात आले असल्याने, सदरहू वीज प्रकल्प कोणत्याही क्षणी बंद होण्याचा धोका निर्माण झाल्याचे महानिर्मिती कंपनीने दिनांक १५ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अचानक वीज प्रकल्प बंद होऊन जनतेची गैरसोय होऊ नये म्हणून सदरहू वीज प्रकल्प त्वरीत बंद करुन वीज मागणीची पूर्तता करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती पर्यायी योजना आखली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## करमाळा (जि.सोलापुर) तालुक्यातील श्री आदिनाथ व श्री मकाई सहकारी साखर कारखान्याने शेतकऱ्यांच्या ऊसाची देयके एफ.आर.पी.प्रमाणे अदा करण्याबाबत

**(१५) * १४००३९ श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापुर) तालुक्यातील श्री आदिनाथ व श्री मकाई सहकारी साखर कारखान्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांची ऊस देयके एफ.आर.पी.प्रमाणे तसेच वाहन मालक व गाव टोळी यांची सन २०१५-१६ पासूनची देयके वारंवार मागणी करुन देखील अदा केली नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त दोन्ही कारखान्यातील कामगार, ऊस उत्पादक शेतकरी व वाहन मालक यांनी त्यांच्या शेती ७/१२ व वाहनावर आय.सी.आय.सी.आय. बँकेतून कर्ज काढलेली असल्याने इतर बँका कर्ज देत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोन्ही कारखान्यांनी शेतकरी, वाहन मालक व कामगार यांची देयके अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) अंशत: खरे आहे.

श्री आदीनाथ कारखान्याने हंगाम २०१८-१९ मधील देय FRP रु.५८०४.४२ लाख पैकी रू.५५९०.३१ लाख रक्कम शेतकऱ्यांना अदा केली असून दि.१५/०६/२०१९ अखेर कारखान्याकडे रु.२१४.११ लाख थकीत आहेत. तसेच हंगाम २०१५-१६ पासून वाहन मालक व गाव टोळी ऊस तोडणी वाहतुकीचे रु.११९५ लाख थकीत आहेत.

श्री मकाई कारखान्याने हंगाम २०१८-१९ मधील देय FRP रु.३३१८.६४ लाख पैकी रू.१९१५.५२ लाख रक्कम शेतकऱ्यांना अदा केली असून दि.१५/०६/२०१९ अखेर कारखान्याकडे रु.१४०३.१२ लाख थकीत आहेत. तसेच हंगाम २०१७-१८ व २०१८-१९ मधील वाहन मालक व गाव टोळी ऊस तोडणी वाहतुकीचे रु.१४४१.६६ लाख थकित आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

श्री आदिनाथ कारखान्याने आयसीआयसीआय बँकेकडून रु.५४७.२९ लाख कर्ज कारखान्याच्या हमीवर व संचालक मंडळाच्या ठरावानुसार घेतलेले आहे. सदर कर्जापैकी रु.३६२.२९ लाख कर्जाची परतफेड केली असून उर्वरित कर्जबाकी रक्कम उपलब्धतेनुसार भरणा करीत आहे.

श्री मकाई कारखान्याने कामगार, ऊस उत्पादक शेतकरी व वाहन मालक यांच्या शेती ७/१२ व वाहनावर आयसीआयसीआय बँकेकडून कर्ज काढलेली नाहीत.

(३) श्री मकाई कारखान्याकडे हंगाम २०१८-१९ मधील शेतकऱ्यांचे थकीत FRP संदर्भात कारखान्याविरुध्द ऊस (नियंत्रण) आदेश, १९६६ अनुसार रक्कम वसुलीकरीता दि.१४/०२/२०१९ चे RRC आदेशान्वये कारवाई करण्यात आली आहे.

श्री आदिनाथ कारखान्याने हंगाम २०१८-१९ मधील ऊसाचे देय FRP च्या ९६% इतकी रक्कम ऊस पुरवठादारांना अदा केली आहे. श्री आदिनाथ कारखान्यासह इतर सर्वच थकबाकीदार कारखान्यांना FRP चे पेमेंट आठ दिवसात करावे अन्यथा कोणतीही पूर्वसूचना न देता कारखान्याविरुध्द RRC कारवाई करण्यात येईल अशी दि.१८/०६/२०१९ चे पत्रान्वये साखर आयुक्त यांनी अंतिम सूचना दिलेली आहे.

उक्त दोन्ही कारखाने केंद्र शासनाकडून प्राप्त सॉफ्टलोन कर्ज मंजूर रक्कमेतून शेतकऱ्यांची FRP अदा करीत आहेत. तसेच साखर विक्रीतून निधी उपलब्धतेनुसार कामगार, वाहन मालक व गाव टोळी यांची थकीत देयके अदा करीत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वारे खैरपाडा (ता.कर्जत, जि.रायगड) येथील सबस्टेशन कार्यान्वित करण्याबाबत

**(१६) * १३८५०४ श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वारे खैरपाडा (ता.कर्जत, जि.रायगड) येथे महावितरण कंपनीकडून २२ के.व्ही. सबस्टेशन उभारण्यात आले आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, शासनाने करोडो रुपये खर्च करुन उभारण्यात आलेले सबस्टेशन महावितरण कंपनीने कार्यान्वित न केल्यामुळे वारंवार विजपुरवठा खंडीत होत असल्यामुळे ग्रामस्थांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर सबस्टेशन कार्यान्वित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. दि.२८.०२.२०१९ रोजी वारे खैरपाडा येथे २२/२२ केव्ही स्विचिंग स्टेशन कार्यान्वित करण्यात आले आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यातील जात पडताळणीची प्रकरणी निकाली काढण्याबाबत

**(१७) * १३९३९१ श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक विभागातील जात पडताळणीची हजारो प्रकरणे दक्षता पथक आणि चौकशी समितीकडे वर्षानुवर्षे प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी असल्यामुळे सर्व प्रकरणे प्रलंबित असून संथगतीने निकाली काढली जात असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अहवालात काय आढळून आले व त्यानुषंगाने उपरोक्त सर्व प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) दक्षता पथकाकडून चौकशी पुर्ण झालेली प्रकरणे निकाली काढण्यात आलेली आहेत व उर्वरीत प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे लोटे, घाणेखुंट व कोतवली (ता.खेड, जि.रत्नागिरी) या गावातील जमिनी औद्योगिक विकास महामंडळाच्या नावे केल्याबाबत

**(१८) * १३७७२३ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य औदयोगिक विकास महामंडळाने लोटे (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील औदयोगिक क्षेत्रात सीईटीपीचे सांडपाणी वाहून नेण्यासाठी सन १९८१ मध्ये मौजे लोटे, घाणेखुंट व कोतवली या गावातून पाईपलाईन टाकली असून या पाईपलाईनचा वापर काही वर्षापासून होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाईपलाईन उक्त गावातून टाकल्यानंतर तेथील बाधीत शेतकऱ्यांना कोणताही मोबदला अथवा भूभाडे दिलेले नसताना शासनाने परस्पर पाईपलाईनखालील जागा औदयोगिक विकास महामंडळाच्या नावे ७/१२ वर करून घेतली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी ७/१२ वर करण्यात आलेली नोंद रद्द करण्यात यावी, अशी मागणी संबंधित गावच्या ग्रामपंचायती आणि ग्रामस्थांनी शासनाकडे वारंवार केली असून त्यासाठी आंदोलने देखील केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने ७/१२ वर परस्पर नोंद करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

लोटे परशुराम औद्योगिक क्षेत्रातील जल:निसारण योजनेकामी महामंडळाने भूभाड्याने घेतलेल्या जमिनीचे दि. ०१/०५/१९८४ ते ३१/०३/१९९७ या कालावधीतील भू-भाडयाची रु. ५७,७७६.७५/- इतकी रक्कम कार्यकारी अभियंता, मऔवि महामंडळ चिपळूण यांच्यामार्फत वाटप करण्यात आली आहे. तसेच सदर क्षेत्रासाठी अधिसूचीत केलेल्या क्षेत्राच्या संदर्भात ७/१२ च्या उताऱ्यावर इतर अधिकारात नोंद आहे.

(३) व (४) मौजे कोतवली, घाणेखुंट व लोटे या गावाच्या हद्दीमधून जलनि:सारण वाहिनी टाकण्यात आली होती. सदर वाहिनी ज्या जागेमधून टाकण्यात आली होती. त्या जागेचे भूसंपादन प्रस्तावित होते. तथापि, सांडपाणी नि:सारण वाहिनी महामंडळाने सन-२००३ मध्ये काढून नविन वाहिनी सानपात्रा या नदीपात्राच्या कडेला टाकण्यात आल्याने जुन्या वाहिनीच्या भूसंपादनाचे प्रयोजन राहिलेले नाही. त्यामुळे जलनि:सारण वाहिनीखालील जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावरील नोंदी कमी करणे आवश्यक असल्यामुळे मौजे घाणेखुंट, कोतवली व लोटे या गावातील सदर जलनि:सारण वाहिनीखालील अधिसूचित केलेले क्षेत्र विना अधिसूचित करण्यासंबंधीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यासंबंधीची कार्यवाही महामंडळामार्फत करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मालेगांव (ता.जि.नाशिक) येथील संवदगांव गावठाणातील रोहित्र दुरुस्त करण्याबाबत

**(१९) * १३७३८७ श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (ता. जि.नाशिक) येथे गत सहा महिन्यांपासून संवदगांव गावठाणातील रोहित्र चार वेळा नादुरुस्त झाले असून काही दिवसांपासून वीज

पुरवठाही वारंवार खंडित होत असल्याने तेथील ग्रामस्थांनी शासनास निवेदन देऊनही कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार रोहित्र दुरुस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) मालेगांव (ता.जि. नाशिक) येथील संवदगांव गावठाणातील तानाजी मोतीराम हे रोहित्र अतिभारित झाल्याने माहे डिसेंबर, २०१८ या महिन्यात दिनांक १८.१२.२०१८ व दिनांक २१.१२.२०१८ रोजी नादुरुस्त झाले होते. तद्नंतर सदर ठिकाणच्या ६३ के.व्ही.ए. रोहित्राची क्षमतावाढ करुन १०० के.व्ही.चे रोहित्र दिनांक २५.१२.२०१८ रोजी बसविण्यात आल्यानंतर संवदगांव गावठाणातील वीज पुरवठा सुरळीत सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मॅट्रिकोत्तर शिष्यवृती वाटपात झालेला गैरव्यवहार

**(२०) * १३९२२२ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती वाटपात झालेल्या गैरव्यवहारातील २७.३२ कोटी रूपये वसूल करण्याचा तसेच शिष्यवृत्तीची थकीत रक्कम माहे मे २०१९ रोजीपर्यंत जमा न करणाऱ्या संस्था व महाविद्यालयांविरूध्द फौजदारी गुन्हे नोंदवावे, असे आदेश संबधित महाविद्यालयासह नाशिक, ठाणे, अमरावती, व नागपूर येथील अप्पर आयुक्तांना माहे मे, २०१९ रोजी वा त्यादरम्यान आदिवासी विकास आयुक्तांनी दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००१ ते २०१० या कालावधीत राज्यातील शैक्षणिक संस्था, महाविद्यालयांनी २,१७४ कोटी रूपयांचा गैरव्यवहार केल्याचे विशेष चौकशी पथकाने उघडकीस आणले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदर प्रकरणी शिष्यवृत्ती वाटपात झालेल्या गैरव्यवहाराची शासनाने सखोल चौकशी करुन दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) होय, हे खरे आहे.

(२) विभागीय चौकशी पथकाच्या अंतिम अहवालामध्ये आदिवासी विकास विभागांतर्गत सन २००१ ते २०१० या कालावधीत राज्यातील शैक्षणिक संस्था, महाविद्यालयांनी १९१ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे नमूद केले आहे.

(३) विशेष चौकशी पथकाने अंतिम अहवालामध्ये आदिवासी विकास विभागांतर्गत रु.१९१.०८ कोटी इतक्या गैरव्यवहाराच्या रकमेपैकी चौकशी पथक स्थापनेपूर्वी व स्थापन झाल्यानंतर रु.२.६३ कोटीची वसूली शैक्षणिक संस्थांकडून झाली असून उर्वरित रु.१८८.४५ कोटीची गैरव्यवहाराची रक्कम दर्शविली आहे.

प्रकल्पनिहाय सविस्तर अहवालांमध्ये मात्र रु.१५७.१७ कोटी रकमेचा गैरव्यवहार झाल्याचे नमूद केलेले आहे. सदर अहवालातील सर्व संस्थांचे लेखे व कागदपत्रांची पुन्हा पडताळणी केली असता त्यातील काही संस्थांनी कागदपत्रे उपलब्ध करुन दिल्याने, आगावू निधीच्या रकमाचे ताळमेळ घातल्याने, तसेच वसूलपात्र नसलेल्या अशा एकूण रु.१२०.३२ कोटी निधींचे समायोजन करण्यात आले आहे. यामध्ये दोषी आढळलेल्या १२ संस्थांवर गुन्हे दाखल केलेले आहेत. वसुलपात्र रकमेपैकी रु.९.७८ कोटीची वसुली करण्यात आली असून रु.२७.०७ कोटी वसुलपात्र रकमेची वसुली सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उमरगा-लोहारा (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांची वीजदेयके माफ करण्याबाबत

**(२१) * १४१४५६ श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरगा-लोहारा (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांचे १००% वीज देयक माफ करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी मा.ऊर्जामंत्री व मा.पालक सचिव, उस्मानाबाद यांच्याकडे दिनांक १७ मे, २०१९ मध्ये वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे विनंती केली होती, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील शेतकऱ्यांकडून महावितरण कंपनीद्वारा सक्तीने वीज देयके वसुल केली जात असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाकडून दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांचे १००% वीज देयक माफ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच शेतकऱ्यांकडून सक्तीने वीज देयके वसुल करणाऱ्या संबधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२) हे खरे नाही.

उस्मानाबाद जिल्हयामध्ये कृषीपंपाचे एकूण १,४६,१२३ ग्राहक असून माहे मार्च, २०१९ अखेर वीज देयकांची रु.१२६७ कोटी इतकी थकबाकी आहे. सदर थकबाकीसाठी महावितरणने कोणत्याही शेतकऱ्याच्या कृषीपंपाचा वीज पुरवठा खंडीत केलेला नाही व सक्तीने वीज बिल वसूल केलेले नाही.

(३) राज्यातील दुष्काळग्रस्त १५१ तालुक्यांमध्ये व २६८ महसूली मंडळामध्ये शासन निर्णय दिनांक ०६.११.२०१८ व दिनांक २१.०२.२०१९ अन्वये सन २०१८ च्या खरीप हंगामातील अंतिम पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या व

अद्यापही दुष्काळ सदृष्य परिस्थिती घोषित न केलेल्या विविध जिल्ह्यातील एकूण ४५१८ गावांमध्ये दुष्काळ सदृष्य परिस्थिती घोषित करुन त्या भागातील कृषी ग्राहकांना प्रचलित सवलतीच्या ३३.५% सूट व टंचाई सदृष्य गावातील कृषीपंपाची वीजजोडणी खंडीत न करण्याची सवलत देण्यात येत आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यातील आदिवासी मुला-मुलींसाठीच्या स्वतंत्र निवासी आश्रमशाळांबाबत

**(२२) * १३५५१४ श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील आदिवासी अपर आयुक्तांनी आदिवासी मुला-मुलींसाठी स्वतंत्र निवासी आश्रमशाळा ठेवण्याचा प्रस्ताव शासनाकडे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, त्यानुषंगाने सदर प्रस्तावाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) हे खरे नाही.
(२) प्रस्ताव पाठविलेला नसल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिरुर व दौंड (जि.पुणे) तालुक्यातील गावांचा उपसा सिंचन योजनांचा विद्‌युत पुरवठा कार्यान्वित करण्याबाबत

**(२३) * १४०३७१ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरुर व दौंड (जि.पुणे) तालुक्यातील रांजणगांव, सांडस, नागरगाव या गावांचा भिमानदी काठावरील उपसा सिंचन योजनांचा विद्‌युत पूरवठा दिनांक ४ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास पाटबंधारे विभाग व महावितरण कंपनीने खंडीत केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे जिल्ह्यातील इतर गावांप्रमाणे रांझणगांव, सांडस व नागरगावाचा भिमा नदी काठावरील उपसा जलसिंचन योजनांचा विद्‌यूत पूरवठा पुर्ववत कार्यान्वित करुन किमान ८ तास विद्‌यूत पूरवठा सुरु करण्यात यावा, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने सदरहू उपसा सिंचन योजनेला सुरळीत वीज पुरवठा करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) भिमा नदीमधून बंधारे भरण्यासाठी चालू असलेल्या पाणी विसर्गातून मोठया प्रमाणावर उपसा होत असल्यामुळे दुष्काळी परिस्थितीत पिण्याच्या पाण्याचा पाणी पुरवठा गरज असलेल्या ठिकाणी तात्काळ होणे आवश्यक असल्याने, पाटबंधारे विभाग व तहसिलदार, शिरुर यांनी दिलेल्या आदेशानुसार दिनांक ४.५.२०१९ रोजी भिमा व भामा नदीवरील उपसा जलसिंचन योजनांचा व शेतीपंपाचा विद्युत पुरवठा महावितरण कंपनीकडून खंडीत करण्यात आला होता.

(२) हे खरे नाही.

(३) तहसिलदार, तालुका शिरुर, जिल्हा पुणे यांनी दिनांक ०८.५.२०१९ रोजी दिलेल्या सूचनेनुसार भिमा नदीवरील जलसिंचन योजनांचा व शेतीपंपाचा विद्युत पुरवठा सुरु करण्यात आला.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात स्वतंत्र पणन संचालनालयाची स्थापना करण्याच्या प्रस्तावाबाबत

**(२४) * १३५७२७ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील साखर आयुक्तालयाच्या धर्तीवर स्वतंत्र पणन संचालनालयाची स्थापना करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच तद्संबंधी सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) यासंदर्भात पणन संचालक यांनी सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांच्या आस्थापनेवरील पदे, पणन संचालनालयास द्यावयाची पदे व नव्याने निर्माण करावयाची पदे हे लक्षात घेऊन सुधारित आकृतीबंध सादर करण्याचे शासन पत्र दि.२३.०१.२०१९ व दि.०७.०३.२०१९ नुसार सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना कळविण्यात आले आहे.

सुधारित प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर, वित्त विभागाच्या मान्यतेने सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व क्षेत्रीय कार्यालयांसाठी सुधारित आकृतीबंध निश्चित करता येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोकुंदा (ता किनवट, जि.नांदेड) येथील आदिवासी वसतिगृहात विदयार्थ्याचा झालेला मृत्यू

**(२५) * १४१६५३ श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोकुंदा (ता.किनवट, जि.नांदेड) येथील आदिवासी वसतीगृहातील एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक २८ एप्रिल, २०२९ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) होय, हे खरे आहे.

(२) श्री.उध्दव रामजी मलकुलवाड सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षामध्ये बी.ए. द्वितीय वर्षामध्ये सरस्वती महाविद्यालयात शिक्षण घेत होता. परीक्षा

संपल्यावर तो दिनांक १५.४.२०१९ रोजी स्वगावी गेला होता. वसतीगृहात हजर असलेल्या श्री.परमेश्वर गायकवाड या विद्यार्थ्याच्या सांगण्यावरुन रविवार दिनांक २८.०४.२०१९ रोजी दुपारी ३.३० वा. श्री.उध्दव मलकुलवाड वसतीगृहात परत आला होता व त्याला अस्वस्थ वाटत होते.

दिनांक २८.४.२०१९ रोजी सायंकाळी ६.३० वा. श्री.परमेश्वर गायकवाड शौचालयाकडे गेला असता शौचालयाचा दरवाजा बंद होता व दरवाजाच्या फटीतून केस दिसत असल्याचे त्याचे निदर्शनास आले. वसतीगृहातील शिपायाच्या मदतीने शौचालयाचा दरवाजा तोडण्यात आला असता श्री.मलकुलवाड पालथा पडलेला दिसून आला. श्री.मलकुलवाड याला ग्रामीण रुग्णालय, गोकुंदा, ता.किनवट येथे हलविण्यात आले असता त्याला रात्री ११.३० वा. डॉक्टरांनी तपासणी करुन मृत घोषीत करण्यात आले आहे. मयत विद्यार्थ्याचे शव विच्छेदन करण्यात आले असून विसेरा पुढील तपासणीकरीता पाठविण्यात आला असून अंतिम अहवाल अप्राप्त आहे.

गृहपाल व पहारेकरी हे दिनांक २८.४.२०१९ रोजी वसतीगृहात उपस्थित नसल्यामुळे त्यांना निलंबित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परांडा (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील शेतकऱ्यांना कांदा अनुदानाची रक्कम मिळण्याबाबत

**(२६) * १३७५९३ श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परांडा (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील शेतकऱ्यांनी अल्पदराने बाजार समितीत कांदा विक्री केली असून, सदर कांद्याचे अनुदान १२८३ शेतकऱ्यांना अद्यापही देण्यात आलेले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी या शेतकऱ्यांनी दिनांक १ नोव्हेंबर, २०१८ ते २८ फेब्रुवारी, २०१९ पर्यंत ४ टप्प्यात अर्ज करुन देखील अनुदानाची रक्कम मिळाली नसल्यामुळे त्यांच्यात असंतोष निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने उक्त शेतकऱ्यांना अनुदानाची रक्कम त्वरीत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१), (२), (३) व (४) हंगाम २०१८-२०१९ मध्ये राज्यात दिनांक १ नोव्हेंबर, २०१८ ते दिनांक १५ डिसेंबर, २०१८ या कालावधीत राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समिती व खाजगी बाजार समित्यामध्ये कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांना रुपये २००/-प्रति क्विंटल अनुदान व २०० क्विंटल प्रति शेतकरी या प्रमाणात अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर कांदा अनुदानाच्या कालावधीत वेळोवेळी वाढ करण्यात आली असून,सुधारित कालावधी दिनांक १ नोव्हेंबर, २०१८ ते दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९ असा निश्चित करण्यात आला आहे.

दिनांक १ नोव्हेंबर, २०१८ ते दिनांक १५ डिसेंबर, २०१८ या कालावधीतील विक्री केलेल्या १,६०,६९८ पात्र लाभार्थी शेतकऱ्यासाठी रुपये ११४.८० कोटी निधी आकस्मिकता निधीद्वारे उपलब्ध करुन वितरित करण्यात आला आहे. त्यानुसार उस्मानाबाद जिल्ह्यातील कृषि उत्पन्न बाजार समिती परांडाकडून प्राप्त झालेल्या ६०८ शेतकऱ्यांना रुपये ५२,१९,१३८ इतके अनुदान वितरित करण्यात आले आहे.

उर्वरित कालावधीसाठी राज्यातील १८ जिल्ह्यातील प्रस्तावासाठी रुपये ३८७ कोटीची मागणी करण्यात आली असून, निधी उपलब्ध झाल्यानंतर वितरित करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे शिवडाव (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) येथील वीज जोडणीचा होत असलेला नियमबाहय वापर

**(२७) * १४१२४७ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शिवडाव (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) येथील श्रीमती उषा भास्कर पारकर यांच्या नावे सर्व्हे क्र.३०३/१ मध्ये असलेल्या मिळकतीत सौ.समृध्दी संदेश पारकर यांच्या नावे ग्रा.क्र.२३०१६०००८८५२ ची विद्युत जोडणी माहे जानेवारी, २०१७ मध्ये स्टोन क्रशरसाठी घेण्यात आली आहे. तसेच सर्वे क्र.३०२/२ मधील दुसरी विद्युत जोडणी श्री.संदेश भास्कर पारकर ग्रा.क्र.२३०१६०००९०५१ यांच्या वाळू प्लांटसाठी माहे एप्रिल २०१८ मध्ये घेण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू सर्व्हे क्र. ३०२/२ असलेल्या ग्रा.क्र. २३०१६०००९०५१ या विद्युत जोडणीचा वापर हा वाळू प्लांटसाठी न होता, सर्वे क्र.३०३/१ मध्ये ग्रा.क्र.२३०१६०००८८५२ या विद्युत जोडणीवर असलेल्या स्टोन क्रशरसाठी होत आहे, असे उप कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. उपविभाग, कणकवली यांनी दि. ३० मार्च २०१९ रोजी सदर ठिकाणचे स्थळ परिक्षण केले असता, निदर्शनास आले आहे व ही बाब कंपनीची दिशाभूल करणारी असून कंपनी नियमानुसार ती बेकायदेशीर व दंडात्मक कारवाईस पात्र आहे, असे कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, मर्या. कणकवली, यांना पत्र क्र.५४८ दि.२० एप्रिल २०१९ रोजी अन्वये कळवून सदर बाबतीत कोणती कारवाई कशा स्वरुपात करावी याचे मार्गदर्शन मागितले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषीं विरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी महावितरण कंपनीमार्फत चौकशी करण्यात आली आहे.

(४) श्री.संदेश भास्कर पारकर यांना विद्युत अधिनियम, २००३ मधील कलम १२६ नुसार रु.२४,५१,१४९.९८ इतक्या रकमेचे पुरवणी वीज देयक देण्यात आले आहे. उप कार्यकारी अभियंता, उप विभाग, कणकवली यांच्या दिनांक

०१.०६.२०१९ रोजीच्या पत्रानुसार सदर रक्कम तीन दिवसाच्या आत भरणा करणेबाबत त्यांना सूचना देण्यात आली आहे. सदर ग्राहकाचा (ग्रा.क्र.२३०१६०००९०५१) विद्युत पुरवठा खंडीत करण्यात आलेला असून त्यांना उच्चदाब विद्युत कनेक्शन घेण्यास कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्हयातील आदिवासी विकास विभागातील अधिकारी व ठेकेदारांनी फर्निचर खरेदीमध्ये केलेला गैरव्यवहार

**(२८) * १३८९७२ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील आदिवासी विकास विभागाने राज्यातील शासकीय आश्रमशाळा आणि वसतिगृहांसाठी सुरु केलेल्या कायापालट अभियानातून ठेकेदार व संबंधित अधिकारी यांनी जिल्हयातील ५०२ संस्थांतील विद्यार्थांसाठी असलेल्या योजनेतून फर्निचर खरेदीचा ११२ कोटींचा प्रस्ताव नियम डावलून ३२५ कोटी रुपयांना फर्निचर खरेदी करुन गैरव्यवहार केल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित अधिकारी व ठेकेदारांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) सदर निविदा प्रक्रिया GeM पोर्टलदवारे (ऑनलाईन) विहित प्रक्रियेनुसार पार पाडण्यात आलेली आहे. निविदा पारदर्शकपणे व खरेदी धोरणातील तरतुदीस अनुसरुन पार पाडण्यात आलेल्या असून सदर खरेदी प्रक्रियेसंदर्भात उदयोग विभागानेही सहमती दर्शविलेली आहे. सदर प्रक्रियेत कोणत्याही प्रकारची अनियमितता झालेली नाही. तसेच या प्रक्रियेबाबत काही

लोकांनी मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असता न्यायालयाने कोणत्याही प्रकारची स्थगिती देण्यास नकार देऊन रिट याचिका क्र.२४३६/२०१९ यावर दि. ११.०४.२०१९ रोजीच्या आदेशान्वये मा.उच्च न्यायालयाने निविदा प्रक्रिया पुढे चालू ठेवण्याचा निर्णय दिलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित असल्याबाबत

**(२९) * १३६६३० श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) : दिनांक - रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक मधील प्रश्न क्रमांक ११७५५१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील लाखो मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीपासून वंचित ठेवणाऱ्या महाडीबीटी प्रणालीचे लेखापरिक्षण माहे मार्च २०१९ पर्यंत प्रलंबित असून मागासवर्गीय विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षणासाठी शासनाकडून दिल्या जाणाऱ्या फ्री-शीप / शिष्यवृत्ती योजनेंतर्गत महाविद्यालयीन फी ची रक्कम देण्यात येत असली तरी ही रक्कम मुदतीत मिळत नसल्याच्या अनेक तक्रारी शासनास प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ३० हजार शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थांना मॅट्रीकोत्तर व व्यावयायिक अभ्यासक्रमाच्या शिष्यवृतीचे ऑनलाईन अर्ज शैक्षणीक संस्थांनी अडवुन ठेवले असून याबाबत वारंवार सुचना देऊनही अनेक अर्ज शैक्षणिक संस्था स्तरावर प्रलंबित असल्याने शिष्यवृत्ती मिळाली

नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच शिष्यवृत्ती करिता नोंदणी करावयाच्या महाडीबीटी संकेत स्थळावर नर्सिंगच्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची नोंद नसल्यामुळे या विद्यार्थ्यांचा शिष्यवृत्तीचा अर्ज स्वीकारला जात नसल्याची बाब दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यामुळे राज्यातील विषेशतः सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत वसतिगृहातील राहणाऱ्या विद्यार्थ्यांना व पुण्यातील अनेक शेक्षणिक संस्थेतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या रकमेपासून वंचित राहावे लागत आहे, हे ही हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले व चौकशी अहवालानुसार महाडीबीटी प्रणालीचे लेखापरिक्षण करुन संकेतस्थळावर नर्सिगच्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची नोंद करुन मागासवर्गीय विद्यार्थ्यांना तात्काळ शिष्यवृत्ती मिळण्याच्या दृष्टीने शालेय व महाविद्यालय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीपासुन वंचीत ठेवणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कामकाजाची सखोल चौकशी करून कायदेशीर कारवाई करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) अंशतः होय,

महाडिबीटी प्रणालीवर शिष्यवृत्तीच्या योजनांची अंमलबजावणी करण्याचे २०१८-१९ हे पहिले वर्ष असून, सदर प्रणालीमार्फत पात्र विद्यार्थ्यांना शैक्षणिक लाभ देण्यास विलंब झाला असला तरी त्या-त्या योजनांतर्गत अनुसूचित जाती प्रवर्गातील पात्र विद्यार्थी वंचित राहणार नाहीत, याची दक्षता घेण्यात आलेली आहे.

महाडीबीटी प्रणाली माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून विकसित करण्यात आली असून, सदर महाडिबीटी प्रणालीच्या लेखापरिक्षणाचा प्रस्ताव माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे विचाराधीन वा प्रलंबित नाही.

(२) नाही, माहिती व तंत्रज्ञान विभागाने दिलेल्या माहितीनुसार अद्यापपर्यंत राज्यातील एकूण १३ लाख ६१ हजार ७३८ पात्र विद्यार्थ्यांना शैक्षणिक लाभापोटी अंदाजित रुपये २ हजार ४०७ कोटी इतक्या रक्कमेचे वाटप महाडिबीटी प्रणालीद्वारे करण्यात आलेले आहे.

(३) नाही, अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता महाडीबीटी संकेत स्थळावर नर्सिंगच्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची नोंद संबंधित प्रशासकीय विभागामार्फत करण्यात आलेली असून, सदर अभ्यासक्रमाच्या एकूण ७५० विद्यार्थ्यांनी प्रणालीवर नोंद केलेली असून, त्यापैकी ४२८ अर्ज मान्य करण्यात आले आहेत. तसेच ३१३ पात्र विद्यार्थ्यांना शैक्षणिक लाभाची रक्कम प्रणालीद्वारे वितरीत करण्यात आली असून, उर्वरीत विद्यार्थ्यांच्या लाभाची रक्कम प्रणालीद्वारे वितरीत करण्यात येत आहे.

(४) नाही, सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठासह पुणे जिल्ह्यातील महाविद्यालयांतील प्रणालीवरील एकूण ३४ हजार ४११ अर्ज पात्र आढळुन आले. त्यापैकी महाविद्यालयांनी ३२ हजार ४१९ अर्ज मंजूर केलेले असून, त्यामधील ३१ हजार ०६९ अर्ज जिल्हा कार्यालयाने मंजूर केलेले आहेत. त्यापैकी १५ हजार ९२७ विद्यार्थ्यांना रुपये ५५ कोटी ३२ लाख इतकी शैक्षणिक लाभाची रक्कम वितरीत करण्यात आली आहे. उर्वरीत विद्यार्थ्यांना शैक्षणिक लाभाची रक्कम महाडीबीटी प्रणालीद्वारे वितरीत करण्यात येत आहे.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील कळवा, मुंब्रा, दिवा परिसरामध्ये महावितरणने वीज वितरणाचे खाजगीकरण करण्याचा घेतलेला निर्णय

**(३०) * १३६०६६ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर),**

**श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कळवा, मुंब्रा, दिवा परिसरामध्ये महावितरणने वीज वितरणाचे खाजगीकरण करण्याच्या घेतलेल्या निर्णया विरोधात तेथील नागरीकांनी दिनांक ३ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास आंदोलन करुन मा.ऊर्जा मंत्री तसेच महावितरण प्रशासनाकडे वारंवार तक्रारी केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) तसेच, चौकशीच्या अनुषंगाने उक्त परिसरातील वीज ग्राहकांना येणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अशा आशयाचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) व (३) महावितरणच्या ज्या विभागांत वीजेच्या गळतीचे प्रमाण जास्त आहे, वीज बिल वसुलीचे प्रमाण कमी आहे, तसेच वितरण प्रणालीमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे अशा व इतर सर्व समावेशक बाबींचा विचार करुन असे विभाग फ्रॅन्चाइझी तत्वावर खाजगी कंपनीस ठराविक कालावधीकरिता देण्याचा धोरणात्मक निर्णय महावितरणने घेतलेला आहे.

कळवा, मुंब्रा व दिवा परिसरातील वीज वितरण यंत्रणा व वीज हानी सुधारण्यासाठी महावितरणमार्फत विविध योजनेअंतर्गत उपक्रम राबविण्यात आले. परंतु सदर परिसरात वीज चोरी मध्ये झालेली वाढ, वितरण हानी कमी न झाल्यामुळे विद्युत अधिनियम, २००३ मधील तरतुदीनुसार फ्रेंचाईझीकरण करण्यात आले.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या गोदामात धानाची घट झाल्याबाबत

**(३१) * १३६४८१ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या ७ गोदामातील सुमारे २ कोटी ७९ लक्ष रुपयांचे १८ हजार क्विंटल धानाची घट झाल्याने उक्त प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी उप प्रादेशिक व्यवस्थापक यांनी जव्हार प्रादेशिक व्यवस्थापक कार्यालयाकडे केली असल्याचे माहे, जानेवारी २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास सदर चौकशी दरम्यान काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने संबधित दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) होय.

(२) सदर प्रकरणी दिनांक ३१.०३.२०१७ अखेर हंगाम सन २०१६-१७ च्या साठा पडताळणी मध्ये उप प्रादेशिक कार्यालय, शहापूर अंतर्गत पळशिन व मढअंबर्जे आदिवासी विविध कार्यकारी संस्थेच्या गोदामांमध्ये अवास्तव स्वरुपात घट आल्याने उप प्रादेशिक व्यवस्थापक, जव्हार यांची चौकशीसाठी नियुक्ती करण्यांत आली.

(३) प्रस्तुत प्रकरणी हंगाम सन २०१३-१४ मध्ये ५४७२.३० क्विंटल रक्कम रु.८२,६३,१७३/- व हंगाम सन २०१६-१७ मध्ये ६१८७.७८ क्विंटल रक्कम रु.१,०३,३३,५९२/- असे एकूण रक्कम रु.१,८५,९६,७६५/- इतक्या रकमेच्या धानाची अफरातफर केल्याचे निदर्शनास आल्याने, पळशिन व मढअंबर्जे आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थांचे सचिव श्री.भरत घनघाव यांचेविरुध्द वाशिंद पोलिस स्टेशन येथे FIR क्र.००५८, दि.०८.०५.२०१९ दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्हयात शेतकऱ्यांचे शेतीपंप वीज जोडणीचे अर्ज प्रलंबित असल्याबाबत

**(३२) * १३४९१५ श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: कोल्हापूर जिल्हयातील प्रलंबित कृषीपंपाना वीज जोडण्या देण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम राबवून माहे जुलै, २०१८ पर्यंत प्रलंबित वीज जोडण्या देण्याचे आश्वासन मा.ऊर्जा मंत्री यांनी माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान नागपूर येथे झालेल्या बैठकीत दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाहुवाडी व पन्हाळा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील शेतकऱ्यांनी सन २०१४ पासून कृषिपंपासाठी वीज जोडणी मिळण्याबाबत महावितरणकडे पैसे भरुनही अद्यापही शेतकऱ्यांना कृषिपंपासाठी वीज जोडणी देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची प्रलंबित वीज जोडणी एच.व्ही.डी.एस. योजनेतून देण्याबाबत महावितरणाने निश्चित केले असून त्यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण केलेली असताना आवश्यक असणारी रोहित्रे मुबलक प्रमाणात उपलब्ध होत नसल्यामुळे कृषिपंपासाठी वीज जोडणीचे काम संथगतीने सुरु असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पाणी असूनही केवळ वीज पुरवठा नसल्याने शेतीचे नुकसान होत असल्याचे ही निदर्शनास आले असून शेतकरी ग्राहकास महावितरणकडून सौर कृषी पंप योजना शेतकऱ्यांची इच्छा नसतानाही त्यांच्यावर घेण्यास सक्ती करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषगांने शेतकऱ्यांना कृषिपंप वीज जोडणीचे काम पुर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) कोल्हापूर जिल्हयातील शाहूवाडी व पन्हाळा तालूक्यात सन २०१४-१५ पासून माहे मे २०१९ अखेर अनुक्रमे १३०२ व २८५७ वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत. तसेच अनुक्रमे ३५४ व २९२ कृषीपंप अर्जदार पैसे भरुन वीज जोडणीकरिता प्रलंबित आहेत.

(३) उच्च दाब वितरण प्रणाली योजना राज्यात दिनांक ०५.०५.२०१८ च्या शासन निर्णयान्वये अंमलात आली आहे. तद्नंतर रोहित्र व मिटर पुरवठयाकरिता ऑक्टोबर, २०१८ मध्ये महावितरणद्वारे निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. नोव्हेंबर, २०१८ मध्ये पात्र पुरवठादारास कार्यादेश देण्यात आले आहेत. डिसेंबर, २०१८ पासून रोहित्राचा पुरवठा सुरु झाला परंतु फेब्रुवारी २०१९ पर्यंत पुरवठा कमी प्रमाणात होता. तथापि आता रोहित्र पुरवठ्याचा वेग वाढला असून, पन्हाळा तालुक्यासाठी एकूण १८ रोहित्र व शाहुवाडी तालुक्यासाठी एकूण २५ रोहित्र देण्यात आले असून पन्हाळा तालुक्याअंतर्गत २५ वीज जोडण्या व शाहुवाडी तालुक्याअंतर्गत ०८ वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत.

(४) हे खरे नाही. शाहूवाडी व पन्हाळा तालुक्यामधील उच्चदाब वितरण प्रणाली योजनेअंतर्गत पात्र अर्जदारांना उच्चदाब वितरण प्रणाली योजनेतून वीज जोडणी देण्यात येत आहे. ज्या अर्जदारांना कृषिपंप वीज जोडणी देण्याकरिता विद्युत पायाभूत सुविधा उभारणीचा खर्च रु. २.५० लाखापेक्षा जास्त येत आहे. अशा कृषीपंप ग्राहकास सोलार पंप कनेक्शन घेण्याकरीता प्रोत्साहीत करण्यात येत आहे.

(५) उच्चदाब वितरण प्रणाली योजनेअंतर्गत शाहुवाडी व पन्हाळा तालुक्याअंतर्गत वीज जोडण्या देण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

तसेच, एप्रिल-२०१८ नंतर मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजनेअंतर्गत एकूण २५९५ अर्ज प्राप्त झाले आहेत. यापैकी ८९३ कृषीपंपाना मंजूरी देणेत आली असून त्यापैकी ३५० ग्राहकांना आवश्यक रक्कम भरणेकरीता कोटेशन देण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लोहोनेर (ता.देवळा, जि.नाशिक) येथील ऊस उत्पादक शेतकऱ्यांची देय रक्कम अदा करण्याबाबत

**(३३) * १३६१४८ श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोहोनेर (ता.देवळा, जि.नाशिक) येथील वसंतदादा पाटील सहकारी साखर कारखान्याची सन २०१८-१९ च्या गळीत हंगामासाठी पुरवठा केलेल्या बहुसंख्य ऊस उत्पादक शेतकऱ्यांची देय रक्कम अदा केली नसल्याचे दिनांक ७ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी माहे जानेवारी, २०१९ नंतर पुरवठा केलेल्या ऊसाची देय रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग झाली नसून, कारखान्याने अदा केलेले धनादेश वटत नसल्याची तक्रारही साक्री तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने ऊस उत्पादक शेतकऱ्यांची देय रक्कम त्वरीत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख** : (१) होय.

वसंतराव दादा पाटील सहकारी साखर कारखाना म., विठेवाडी, ता.देवळा, जि.नाशिक या कारखान्याकडे दि.१५/०२/२०१९ अखेर ऊस पुरवठादार शेतकऱ्यांचे हंगाम २०१८-१९ मध्ये गाळप केलेल्या ऊसाचे देय FRP प्रमाणे रू.९७५.८८ लाख थकित होते.

(२) व (३) सदर कारखान्याने ऊस बिलाची रक्कम अदा केली नसल्याबाबत तक्रार अर्ज प्राप्त झाले आहेत. थकित FRP संदर्भात कारखान्याविरूद्ध ऊस (नियंत्रण) आदेश, १९६६ अन्वये दि.२५/०३/२०१९ चे RRC आदेशानुसार रू.९७५.८८ लाख रक्कम वसुलीकरिता जिल्हाधिकारी, नाशिक यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे. त्यानुषंगाने तहसिलदार, देवळा यांनी सदर कारखान्याची साखर जप्त करून साखरेच्या विक्रीतून प्राप्त रक्कम रु.९२२.७८ लाख रकमेतून ऊस पुरवठादारांना FRP ची रक्कम अदा करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळेमध्ये तांत्रिक शिक्षण सुरु करण्याबाबत

**(३४) * १४०४१२ श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळेमध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या धर्तीवर तांत्रिक शिक्षण सुरु करण्याची शासनाने घोषणा केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) हे खरे नाही.

(२) राज्यात तांत्रिक शिक्षणाचे नियंत्रण व अंमलबजावणी कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या अधिनस्त आहे. सदर विभागाकडून आदिवासी विद्यार्थ्यांच्या तांत्रिक शिक्षणासाठी आदिवासी उपयोजनेअंतर्गत ६१ ठिकाणी औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु आहेत. त्यात सन २०१८-१९ मध्ये ११५५१ विद्यार्थी शिक्षण घेत होते. तर आदिवासी व्यवसाय शिक्षणाचे सार्वत्रिकरण या योजनेअंतर्गत २८ ठिकाणी आदिवासी आश्रमशाळांचे रुपांतर निवासी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये करण्यात आलेले असून त्यामध्ये २०१८-१९ मध्ये १२५४ विद्यार्थी प्रवेशित होते. सदर योजनाबाबतची आर्थिक तरतूद आदिवासी विकास विभागाकडून करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील प्राथमिक शाळांना वीज देयके अदा करण्यासाठी निधी मिळण्याबाबत

**(३५) * १३६६०० श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील जिल्हापरिषदेच्या सुमारे ४०६ प्राथमिक शाळांनी वीज देयके न भरल्यामुळे महावितरण कंपनीकडून गत एक वर्षभरापासून वीज पुरवठा बंद असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शाळांना वीज देयके भरण्यासाठी शासनाकडून पुरेसा निधी मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, व त्याअनुषंगाने वीज देयके अदा करण्यासाठी शासनाकडून निधी मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) रायगड जिल्हा परिषदेच्या ४०६ प्राथमिक शाळांचे वीज देयक अदा न केल्याने वीज पुरवठा खंडीत करण्यात आला.
(२) व (३) समग्र शिक्षा अभियान, जिल्हा परिषद सेस फंड इत्यादी निधीमधून जिल्हा परिषद शाळांची वीज देयके अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आदिवासी विकास विभागांतर्गत असलेल्या एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालयात झालेला गैरव्यवहार

**(३६) * १४०१८६ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विकास विभागांतर्गत असलेल्या एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालयात सुमारे एक कोटीहून अधिक रकमेचा गैरव्यवहार झाल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) होय.
आदिवासी विकास विभागाअंतर्गत असलेल्या एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालयात १ कोटीहून अधिक रकमेचा अपहार झाल्याचे मार्च २०१९ च्या पूर्वीच निदर्शनास आले आहे.

(२) प्रस्तुत प्रकरणी सेवानिवृत्त न्यायमूर्ती श्री.एम.जी.गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त समितीने सखोल चौकशी केली आहे.
(३) न्या.गायकवाड समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालामध्ये नमूद दोषी अधिकारी/कर्मचारी आणि संस्थांविरुध्द विविध पोलीस स्टेशनमध्ये तक्रारी दाखल करण्यात आल्या असून, दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दिघा (नवी मुंबई) येथील एमआयडीसीच्या जागेवर बांधण्यात आलेल्या इमारतींवर कारवाई करण्याबाबत

**(३७) * १३८१११ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **उद्‌योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिघा (नवी मुंबई) येथील एमआयडीसीच्या जागेवर बांधण्यात आलेल्या ९९ बेकायदा इमारती पाडण्याचे आदेश मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिल्यानंतर एमआयडीसीने आतापर्यंत ४ इमारतींवर कारवाई केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, असे असतानाही बेकायदा इमारतींमधील घरांची विक्री सध्या सुरू असून १० लाख रुपयांमध्ये तीन खोल्यांच्या सदनिकांचा व्यवहार होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करून बेकायदेशीर बांधकामांवर कारवाई करून नागरिकांची होणारी फसवणूक थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे,

म.औ.वि.महामंडळाने मा.उच्च न्यायालय,मुंबई यांच्या आदेशानुसार ऑक्टोंबर, २०१५ मध्ये दिघा पुर्व भागातील केरु प्लाझा, शिवराम अपार्टमेंट व पार्वती या ३ इमारती तसेच मार्च, २०१९ मध्ये दिघा येथील पांडुरंग अपार्टमेंट ही १ इमारत अशा एकूण ४ इमारती निष्कासनाची कार्यवाही केली आहे.

(२) अशाप्रकारे व्यवहार होत असल्याची बाब महामंडळाच्या निदर्शनास आलेली नाही.

(३) मा.उच्च न्यायालय, मुबई यांच्या निर्देशानुसार घ्यावयाच्या दक्षतेअंतर्गत म.औ.वि. महामंडळामार्फत बेकायदेशीर अनधिकृत बांधकामाच्या खरेदी-विक्री व्यवहारात सहभागी न होण्याबाबत दि.१६/०२/२०१९ रोजी टाईम्स ऑफ इंडिया, नवभारत टाईम्स आणि लोकमत या वर्तमानपत्रात इंग्रजी, हिंदी व मराठी भाषेत जाहिर सूचना प्रकाशित केल्या आहेत. तसेच उर्वरीत बेकायदा इमारती पाडण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) लागू नाही.

-----------------

## चंद्रपूर येथील महाऔष्णीक विद्यूत केंद्रातील संच बंद असल्याबाबत

**(३८) * १३५००६ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील महाऔष्णिक विद्युत केंद्रातील ५०० मेगावॅटचे ६ व ७ क्रमांकाचे २ संच माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान बंद असल्याने १००० मेगावॅटची निर्मिती होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी वीज तुटवड्यामुळे भारनियमात मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून पिण्याच्या पाण्याची व शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वीज संच बंद असल्याने त्याबाबत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संच दुरुस्ती करुन भारनियमन रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशत: खरे आहे.

चंद्रपूर येथील महाऔष्णिक विद्युत केंद्रातील ५०० मे.वॅ. संच क्र. ६ हा दिनांक २०.०२.२०१९ ते २९.०४.२०१९ या कालावधीमध्ये व ५०० मे.वॅ. चा संच क्र. ७ हा दिनांक ०३.०३.२०१९ ते २०.०३.२०१९ या मध्ये तांत्रिक कारणास्तव बंद होते.

(२) हे खरे नाही.

राज्यात वीजेच्या मागणीएवढी वीजेची उपलब्धता असल्याने राज्यात कोठेही भारनियमन करण्यात आलेले नाही.

(३) (अ) चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र येथील संच क्र.६ दि. २०.०२.२०१९ ते २९.०४.२०१९ या दरम्यान "Generator Rotor Earth Fault" बिघाड झाल्यामुळे बंद करावा लागला. सदर संचासाठी नवीन Rotor मे.भेल कडून उपलब्ध होण्यासाठी एक वर्षाचा कालावधी लागणार होता.

तथापि, तात्काळ इतर औष्णिक विद्युत केंद्रात चौकशी केली असता NTPC, तालचेर, ओडिशा येथे त्यासारखा Generator Rotor असल्याची खात्री झाल्यानंतर तांत्रिक व प्रशासकीय बाबींची पूर्तता केली. दि.३०.०३.१९ रोजी Generator Rotor ओडिशा येथून निघून दि. ०७.०४.१९ रोजी चंद्रपूर म.औ.वि.केंद्र येथे प्राप्त झाला, त्यानंतर तांत्रिकरित्या सदर Rotor स्थापित करुन योग्य त्या चाचण्या केल्यानंतर दि. २९.०४.१९ रोजी संच क्र.६ कार्यान्वित करण्यात आला. NTPC कडून Generator Rotor आणून तीस दिवसात संच सुरु करण्यात आला.

(ब) संच क्र ७ बाष्पक नलिका गळती व टर्बाइनसंबंधीच्या काही तांत्रिक अडचणीमुळे कमी कालावधीसाठी बंद होता. मात्र नियोजित कामे तत्परतेने पूर्ण करुन सदर संच नियमितपणे सुरु ठेवण्यात आला आहे.

(क) सबब, संच क्र ६ व संच ७ ची वीजनिर्मिती नियमितपणे सुरु आहे.

(४) संचाच्या देखभाल दुरुस्तीचे काम नियोजनानुसार करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सर्वोच्च न्यायालयाने वनहक्क कायदयानुसार दावे नाकारल्यामुळे आदिवासी कुटुंबे बेघर झाल्याबाबत

**(३९) * १३६९३६ श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर्वोच्च न्यायालयाने वनहक्क कायदयानुसार दावे नाकारलेल्या कुटूंबांची जमीन काढून घेण्याचे आदेश दिल्याने राज्यातील १ लाख ७५ हजार आदिवासी कुटूंबे बेघर होणार असल्याचे दिनांक २३ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात बाजू मांडण्यात शासन अपयशी ठरले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या संदर्भात पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयात दाद मागून या बाधित आदिवासींना त्यांच्या जमिनीचे ७/१२ उतारे देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) हे खरे नाही,

मा.सर्वोच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्रमांक १०९/२००८ च्या अनुषंगाने वनहक्क कायदा, २००६ अंतर्गत वनहक्क दावे अमान्य करण्यात आलेल्या दावेदारांना निष्कासित करण्यात यावे, असा आदेश दिनांक १३/०२/२१९ रोजी केला असला तरी, सदर आदेशास मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.२८/०२/२०१९ रोजी स्थगिती दिलेली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९ रोजी दिलेल्या आदेशानुसार दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ पर्यंत जिल्हास्तरीय समितीने अमान्य केलेले दावे व अपिले यांची आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांच्यामार्फत तपासणी करण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणी दि.१२/७/२०१९ पुर्वी मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये शपथपत्र दाखल करावयाचे असून त्यानुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्हयातील आदिवासी बांबू प्रक्रिया सहकारी संस्थेत झालेला गैरव्यवहार

**(४०) * १३९४७७ डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयातील आदिवासी बांबू प्रक्रिया सहकारी संस्था येथील आदिवासी लोकांना बांबू प्रक्रिया प्रकल्पाच्या माध्यमातून रोजगार प्राप्त करून देण्याच्या खोट्या उद्देशाने प्रकल्प कार्यालय गडचिरोलीच्या प्रस्तावाविनाच १९ कोटी ४० लक्ष ९४ हजार रुपयाचा बांबू प्रकल्प मंजूर करुन घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास गडचिरोली प्रकल्प कार्यालयांतर्गत या प्रकल्पासाठी ७ कोटी ३१ लक्ष रुपयाचे वितरणही सदर संस्थेला देण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास या प्रकल्पात अनियमितता असल्याची तक्रार सचिव स्तरावर करण्यात आली असून देखील ५ कोटी १७ लक्ष रुपयाचा रोखुन ठेवलेला निधी श्री.टी एस.के. रेड्डी, व्यवस्थापकीय संचालक, बांबू विकास मंडळ, नागपूर यांच्या शिफारशीनुसार मंजूर करण्यात आला हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास श्री.टी.एस के. रेड्डी यांचा गडचिरोलीतील वादग्रस्त कार्यकाळ बघता त्यांची शिफारस आर्थिक लाभातून झाली असण्याची शक्यता नाकारता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) व (२) नाही.

(३) विशेष केंद्रीय सहाय योजने अंतर्गत बांबु प्रक्रिया प्रकल्प, गडचिरोलीसाठी सन २०१५-१६ साठी रु.५१७.०० लक्ष निधी व सन २०१६-१७ साठी रु.५१७.०० लक्ष असा एकूण रु.१०३४.०० लक्ष निधी मंजूर करण्यांत आला आहे. श्री.टी.एस के रेड्डी, व्यवस्थापकीय संचालक, बांबू विकास मंडळ यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या शिफारशीनुसार निधी वितरण करण्यास मंजूरी प्राप्त झाली आहे. परंतु सद्य:स्थितीत सामंजस्य करार (MOU) करण्याची कार्यवाही सुरु असल्याने, सदर निधीपैकी कोणतीही रक्कम अद्याप संबंधित संस्थेस अदा करण्यांत आलेली नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूरच्या परिसरातील औद्योगिक वसाहतीवर वीज दर वाढीमुळे मंदीचे सावट निर्माण झाल्याबाबत

**(४१) * १३४९८७ श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१८ नंतर वीजदरात २५ ते ३० टक्के दरवाढ झाल्यानंतर आता पुन्हा दिनांक १ एप्रिल, २०१९ पासून १२ टक्के दरवाढ करण्यात आल्याने ही दरवाढ आता सरासरी ४० टक्के इतकी झाली असून त्याचा फटका उद्योग, व्यापार व व्यवसाय यांना बसला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील वीजेवर चालणाऱ्या फौंड्री व्यवसायाला सर्वाधिक फटका बसला असल्याने तेथील ट्रकसारख्या अवजड वाहनांचे मार्केट मंदावले असून फौंड्री उद्योगाला मिळणारे काम कमी झाले असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे कोल्हापूर जिल्ह्यातील चारही एमआयडीसीतील अनेक फौंड्री कारखान्यातील दोन शिफ्ट बंद कराव्या लागल्या असून रात्रपाळीत अधिक उत्पादन होत असतानाही रात्रपाळी देखील अनेक कारखान्यात बंद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील उद्यमनगर, शिरोली, गोकूळ शिरगांव या तिन्ही एमआयडीसीतील फौंड्री आणि मशीन शाफ्ट या दोन्ही उद्योगातील सुमारे ७० ते ७५ हजार कामगार कामाविना बसून आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिनांक १२ सप्टेंबर, २०१८ रोजी महावितरण कंपनीच्या ग्राहकांकरिता सुधारित वीज दर आदेश लागू केले. सदर वीज दर आदेशानुसार सन २०१९-२० करिता लागू असलेल्या वीज दरात सन २०१८-१९ च्या तुलनेत सुमारे ३ टक्के वीज दर वाढ झाली आहे. तसेच उच्चदाब औद्योगिक ग्राहकांकरिता केवळ २ टक्के इतकी वीज दर वाढ झाली आहे.

(२), (३), (४), (५) व (६) कोल्हापूर जिल्ह्यातील स्टिल व फौंड्री उद्योगांची संख्या सन २०१७-१८ या वर्षी २२७ इतकी होती व त्यांचा वार्षिक वीज वापर ६५० द.ल.यु. इतका होता. सन २०१८-१९ या वर्षी या उद्योगांच्या संख्येत वाढ होऊन ती २६२ झाली आहे व त्यांच्या वीज वापरात वाढ होऊन तो ६८७ द.ल.यु. इतका झाला आहे.

फौंड्री उद्योगासाठी केंद्र शासनाच्या इंडस्ट्रीयल इंफ्रास्ट्रक्चर अपग्रेडेशन स्कीम योजनेअंतर्गत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या शिरोली व गोकूळ शिरगाव औद्योगिक क्षेत्र तसेच ल.क. आकिवाटे सहकारी औद्योगिक वसाहत, जयसिंगपूर, शाहू सहकारी औद्योगिक वसाहत, आगर तालुका शिरोळ व कोल्हापूर इंजिनिअरींग असोसिएशन या संस्थाना लाभ देण्यात आलेला आहे.

त्यामध्ये सहकारी औद्योगिक क्षेत्रातील अंतर्गत रस्ते, पथदिवे, पाणीपुरवठा, कॅडकॅम सेंटर व एमआयडीसी औद्योगिक क्षेत्रामध्ये २ सँड रिक्लेमिनेशन प्रकल्पाकरिता केंद्र शासनाकडून अनुदान रु. ३१.६१ कोटी व राज्य शासनाकडून रु.४.२० कोटी इतके अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे. तसेच एमआयडीसी क्षेत्राशिवाय सहकारी औद्योगिक वसाहतीमध्ये स्थापित झालेल्या फौंड्री उद्योजकांना सँड रिक्लेमिनेशन सुविधा उपलब्ध होण्यासाठी राज्य शासनाच्या औद्योगिक समूह विकास योजनेअंतर्गत सामूहिक सुविधा केंद्र प्रस्तावित केले आहे ज्यामध्ये फौंड्री उद्योगासाठी सँड रिक्लेमिनेशन सुविधेचा समावेश आहे.

-----------------

## राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समिती कर्मचाऱ्यांचे प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढण्याबाबत

**(४२) * १३५४५३ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समिती कर्मचाऱ्यांचे प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ५ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी उत्पन्न बाजार समितीमधील सर्व कर्मचारी बांधवांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबतच्या व इतर मागण्यांसाठी दिनांक १५ फेब्रुवारी, २०१९ रोजी कर्मचाऱ्यांच्या वतीने आझाद मैदान, मुंबई येथे बेमुदत उपोषण करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समिती कर्मचाऱ्यांचे प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांना शासनाच्या सेवेत सामावून घेण्यासंदर्भातील शासनास प्राप्त झालेल्या निवेदने तपासून शासनास त्याबाबत सविस्तर अहवाल सादर करण्याकरीता दि.१४.०६.२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास समिती गठीत करण्यात आली होती. अभ्यास समितीच्या शिफारशी दि.२०.११.२०१७ रोजी शासनास प्राप्त झाल्या आहेत. सदर शिफारशींबाबत विधी व न्याय विभाग, वित्त विभाग व सामान्य प्रशासन विभागाशी सल्ला मसलत करुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पारोळा (जि.जळगांव) तालुक्यातील बोरी धरणावरील १२ गावांतील पाणीपुरवठा योजनेचा विद्युत पुरवठा पुर्ववत सुरु करण्याबाबत

**(४३) * १३६८६२ डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पारोळा (जि.जळगांव) तालुक्यातील बोरी धरणावरील १२ गावांना पाणी पुरवठा योजनेंतर्गत केला जाणारा पाणी पुरवठा थकीत वीज देयका अभावी वीज वितरण कंपनीच्या कार्यालयाने खंडीत केल्याने सदरहू गावांतील नागरीकांना पाण्यापासून वंचित राहावे लागत असल्याचे दिनांक २५ नोव्हेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पारोळा मतदार संघात दुष्काळ सदृष्य परिस्थिती निर्माण झालेली असल्याने उक्त विभागातील ग्रामपंचायतीची पाणी पुरवठा योजनेंतर्गत करण्यात येणाऱ्या पाणी पुरवठ्याची वीज देयके प्रलंबित आहेत, तद्नुषंगाने विद्युत पुरवठा पुर्ववत करुन पाणी पुरवठा करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.उर्जा मंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले, तद्नुषंगाने नागरिकांना पाणी पुरवठा योजनेंतर्गत पाणी पुरवठा करण्यासाठी विद्युत पुरवठा पुर्ववत सुरु करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे. महावितरण कंपनीने मौजे पारोळा, जिल्हा जळगांव तालुक्यातील बोरी धरणावरील १२ गावांच्या पाणी पुरवठा योजनेच्या वीज जोडणीचा वीज पुरवठा थकीत वीज देयकाअभावी दिनांक २३ नोव्हेंबर,२०१८ रोजी खंडीत करण्यात आला.

(२) हे खरे आहे.

(३) मुख्याधिकारी, पारोळा यांनी पारोळा (जि.जळगांव) तालुक्यातील बोरी धरणावरील १२ गावांच्या पाणी पुरवठा योजनेच्या पाणी पुरवठ्याची वीज देयके अंशत: भरल्याने दिनांक ०६ डिसेंबर, २०१८ रोजी विद्युत पुरवठा पूर्ववत करण्यात आलेला आहे. तसेच शासन निर्णय दिनांक ११ डिसेंबर, २०१८ नुसार राज्यात दुष्काळ घोषित केलेल्या १५१ तालुके व २६८ महसुली मंडळात ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांची प्रलंबित असलेल्या थकीत विद्युत देयकांच्या मुद्दल रक्कमेपैकी ५% रक्कमेची भरपाई झाल्यावर अशा योजनांचा खंडीत वीज पुरवठा सुरु करण्यात यावा, तसेच राज्यातील गंभीर दुष्काळी परिस्थिती, पाणीसाठे यांचा विचार करता नोव्हेंबर २०१८ ते जून २०१९ या ८ महिन्यांच्या कालावधीतील दुष्काळ घोषित केलेल्या १५१ तालुके व २६८ महसूली मंडळातील ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांची चालू विद्युत देयके मदत व पुनर्वसन विभागाच्या टंचाई निधीमधून उपलब्ध करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## सामाजिक न्याय विभागांतर्गत राज्यातील २३ विना अनुदानीत वृद्धाश्रमांना अनुदान देण्याबाबत

**(४४) * १३९५०५ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागांतर्गत राज्यातील २३ विनाअनुदानीत वृद्धाश्रमांना अनुदान देणाचा निर्णय माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान शासनामार्फत घेण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वृद्धाश्रमातील वृद्धांसाठी परिपोषण अनुदान म्हणून रु.१५०० तसेच कर्मचाऱ्यांच्या मानधनापोटी होणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाच्या निर्णयानुसार वृद्धाश्रमांना अनुदान वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) होय, राज्यातील एकूण २३ मातोश्री वृध्दाश्रमाना अनुदान तत्वावर आणण्याचा शासन निर्णय दिनांक ६ मार्च, २०१९ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे.

(२) होय,

(३) मातोश्री वृध्दाश्रमाना अनुदान देण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे आंबेरे खुर्द (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथील शाळेतील विद्यार्थ्याचा वीज वाहिनीच्या स्पर्शाने झालेला मृत्यू

**(४५) * १३८७९५ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आंबेरे (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथील जिल्हा परिषद मराठी शाळेच्या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी लोखंडी पाईप आणत असताना त्याचा स्पर्श शाळेतील आवारात असलेल्या वीज वाहिन्यांना झाल्याने सातवीमध्ये शिकणाऱ्या एका विद्यार्थ्याचा मृत्यू तर दुसरा विदयार्थी गंभीररित्या जखमी झाल्याची घटना दिनांक २२ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळेलगत असलेले वीज खांब धोकादायक असल्याची तक्रार तसेच सदर वीज खांब अन्यत्र स्थलांतरित करण्याची मागणी स्थानिक ग्रामस्थांनी महावितरण कंपनीकडे केली होती, परंतु, या तक्रारीची दखल न घेतल्यामुळे ही दुर्दैवी घटना घडली हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, भविष्यात पुन्हा अशी घटना घडु नये त्या अनुषंगाने धोकादायक वीज खांब अन्य ठिकाणी स्थलांतरित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने संबधित दोषीवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) तसेच सदर घटनेत मृत्यू झालेल्या व गंभीररित्या जखमी झालेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुबांना शासनाकडून आर्थिक नुकसान भरपाई देण्यात आली आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर जिल्हा परिषद मराठी शाळेच्या आवारात असणारी ११ के.व्ही. वाहिनी स्थलांतरीत करण्यासाठीचे अंदाजपत्रक डी.पी.डी.सी. (जिल्हा नियोजन विकास समिती) योजनेअंतर्गत जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्याकडे सादर

केला असून त्याच्या मंजुरीनंतर सदर वाहिनी त्वरीत स्थलांतरीत केली जाईल.

(४) व (५) विद्युत निरीक्षक, रत्नागिरी यांनी सदर अपघाताची चौकशी केली असून चौकशीत मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शाळा, आंबेरे, ता.गुहागर, जि.रत्नागिरी हे सदर घटनेस जबाबदार आढळलेले असल्याने त्यांना दिनांक १२.४.२०१९ रोजी “कारणे दाखवा नोटीस” बजाविण्यात आली आहे. तसेच मृत व्यक्तीच्या कायदेशीर वारसास व जखमी विद्यार्थ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शाळा, आंबेरे, ता.गुहागर, जि.रत्नागिरी यांना विद्युत निरीक्षक, रत्नागिरी यांनी दिनांक २४.५.२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चिंचगव्हाण (ता.वरुड, जि.अमरावती) येथील शेतकरी दाम्पत्याने अवैध सावकारीच्या जाचाला कंटाळून केलेली आत्महत्या

**(४६) * १३६७९६ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिंचगव्हाण (ता.वरुड, जि.अमरावती) येथील शेतकरी श्री.सोपान गंगाधर शेलोटे व त्यांची पत्नी श्रीमती वंदना सोपान शेलोटे यांनी सुरळी या गावी अवैध सावकाराच्या जाचाला कंटाळून विष प्राशन केल्याने श्री.सोपान गंगाधर शेलोटे यांचा मृत्यू झाला असून त्यांच्या पत्नीची प्रकृती अत्यवस्थ असल्याचे दिनांक १ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकरी श्री. सोपान शेलोटे यांनी तीन हजार रुपयांचे कर्ज घेतले असता त्या मोबदल्यात दहा हजार रुपयांसाठी सावकाराने वारंवार धमकी वजा मागणी केल्याने त्यांनी विष प्राशन करुन आत्महत्या केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने खाजगी सावकारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१), (२) व (३) दैनिक देशोन्नती या वृत्तपत्रामध्ये दिनांक २९.४.२०१९ रोजी प्रसिद्ध झालेल्या मृतक सोपान शेलोटे यांच्या आत्महत्येच्या बातमीच्या अनुषंगाने सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, वरुड यांनी महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ मधील तरतूदीन्वये चौकशी केली. त्यानुसार मृतक सोपान शेलोटे यांनी बजाज फायनान्स कंपनी या खाजगी वित्त पुरवठा कंपनीकडून दुरचित्रवाणी संच (टिव्ही) तसेच मोबाईल खरेदीसाठी घेतलेल्या कर्जाच्या वसूलीसाठी संबंधीत कंपनीचे प्रतिनिधी मृतकांच्या घरी गेल्याचे अहवालामध्ये नमूद केले आहे. त्यामुळे सोपान शेलोटे यांनी केलेली आत्महत्या सावकारी कर्ज वसूलीचा तगादा लावल्यामुळे झाल्याचे सकृतदर्शनी दिसून येत नाही.

मृतक सोपान शेलोटे यांच्या आत्महत्या प्रकरणी पोलिस स्टेशन, वरुड येथे गुन्हा क्र. २०८/२०१९ दिनांक ३०.४.२०१९ रोजी दाखल करण्यात आला असून पोलिसांमार्फत पुढील तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनुसूचित जाती-जमातीच्या विदयार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(४७) * १३७६०० श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ७२ संस्थांमध्ये अनुसूचित जाती-जमातीच्या विदयार्थ्यांच्या नावावर आलेल्या शिष्यवृत्तीमध्ये २८ कोटी रुपये पेक्षा जास्त गैरव्यवहार झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्याऱ्या विशेष चौकशी पथकाने या संस्थांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत अशी शिफारस प्रधान सचिव, सामाजिक न्याय व आदिवासी विकास यांच्याकडे केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री व सामाजिक न्याय मंत्री यांचेकडे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) होय.
(४) विशेष चौकशी पथकाने गुन्हे दाखल करण्याबाबत शिफारस केलेल्या ६८ संस्थांपैकी ४ संस्थाविरोधात पोलिसात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, ४० संस्था ह्या वसूली प्रकरणी न्यायालयात गेल्या असून, उच्च न्यायालयाने काही प्रकरणात “No coercive steps to be taken” असे आदेश पारीत केलेले आहेत. तर उर्वरीत २४ संस्थांवर गुन्हे दाखल करण्याच्या सूचना संबंधित सहायक आयुक्त, समाज कल्याण यांना देण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औष्णिक विद्युत प्रकल्प एकलहरा (ता.जि.नाशिक) येथील ६६० मे.वॅट विद्युत प्रकल्पाचे काम सुरु करण्याबाबत

**(४८) * १३६७२५ श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औष्णिक विद्युत प्रकल्प एकलहरा (ता.जि.नाशिक) येथे मंजूर असलेल्या ६६० मे.वॅट विद्युत प्रकल्पाचे काम सुरु करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ मे, २०१८, दिनांक १० ऑक्टोबर, २०१८ व दिनांक २० फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,नाशिक औष्णिक विद्युत प्रकल्पातील तिन्ही संचांचे आयुर्मान संपत आल्यामुळे या ठिकाणी सन २०११ मध्ये ६६० मे.वॅट च्या प्रकल्पाला मंजुरी देण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकल्पासाठी आवश्यक असलेली जमीन, मुबलक पाणी, ॲश डॅम, स्वतंत्र रेल्वे लाईन, प्रशस्त कामगार वसाहत इ. पायाभूत सुविधा उपलब्ध असूनही प्रकल्पास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नाशिक औष्णिक विद्युत प्रकल्पामध्ये ६६० मे.वॅटच्या विद्युत प्रकल्पाचे काम हाती घेण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशत: खरे आहे.

औष्णिक विद्युत प्रकल्प एकलहरा (ता.जि.नाशिक) येथे ६६० मे.वॅ. विद्युत प्रकल्पाचे काम सुरु करण्यासंदर्भात लोकप्रतिनिधींचे दिनांक २२.०५.२०१८ व दिनांक १०.१०.२०१८ चे मागणीपत्र महानिर्मिती कंपनीस प्राप्त झाले आहे. परंतु, दिनांक २०.०२.२०१९ चे पत्र अप्राप्त आहे.
(२) दिनांक २९.१२.२०११ च्या शासन निर्णयान्वये ६६० मे.वॅ. प्रकल्पाला मंजूरी देण्यात आली आहे.
(३) हे खरे आहे.
(४) प्रकल्प तुर्तास स्थगित ठेवण्यात आला आहे.
(५) प्रकल्प स्थगित ठेवण्याची कारणे पुढील प्रमाणे आहेत :-

सदर प्रस्तावित प्रकल्प हा कोळसा स्त्रोतांपासून दूर अंतरावर आहे. भारत सरकारचे कोळशावर आधारित वीज केंद्रासंदर्भातील नवीन प्रस्तावित धोरणे (जसे की National Merit Order Despatch (M.O.D.), खाणीजवळ असलेल्या परंतु रखडलेल्या (Stranded Pit Head Projects) प्रकल्पांना कोळसा पुरवठा संबंधित धोरण (Flexible Utiliazation of Coal) ही

कोळसा स्त्रोतांपासून दूर अंतरावर असलेल्या प्रकल्पांना कोळसा पुरवठयासंबंधी पूरक नसल्याने प्रस्तावित नाशिक प्रकल्पातील संचामधून वर्षाचे बारा महिने वीज निर्गमित होण्याबद्दल साशंकता आहे. परिणामी कमी वीज निर्मितीमुळे वीज ग्राहकांवर स्थिर आकाराचा भार वाढण्याची शक्यता आहे. करीता सदर प्रकल्प स्थगित ठेवला आहे.

-----------------

## उल्हासनगर (जि.ठाणे) परिसरामध्ये दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत निकृष्ट दर्जाचे काम झाल्याबाबत

**(४९) * १३६०६८ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) परिसरामध्ये दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत निकृष्ट दर्जाच्या झालेल्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याप्रकरणी सखोल चौकशी करुन कारवाई करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक ५ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे वारंवार निवेदनाव्दारे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत तसेच दलित वस्ती सुधार योजनेतंर्गत सोयी-सुविधा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) • उल्हासनगर महानगरपालिकेतील मा.सौ.कविता बागुल व मा.सौ.अंजली साळवे या नगरसेविकांनी दिनांक ०४.०१.२०१९ व दि.०३.०१.२०१९ रोजीच्या स्वतंत्र निवेदनान्वये उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात दलितवस्ती सुधार योजनेंतर्गत निकृष्ट दर्जाच्या कामाबाबत चौकशी करण्याची तक्रार जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे केली आहे, हे खरे आहे.

• सदर तक्रारीच्या अनुषंगाने उप आयुक्त (मुख्यालय), उल्हासनगर महानगरपालिका यांचेस्तरावर चौकशी सुरु आहे.

• यासंदर्भात एका महिन्यात चौकशी करुन घेऊन कारवाई करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, ठाणे यांना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुरबाड (ता.शहापूर, जि.पालघर) येथील शासकीय वसतीगृहातील जेवणात पाल आढळून आल्याबाबत

**(५०) * १४०१९७ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (ता.शहापूर, जि.पालघर) येथील आदिवासी विकास विभागाअंतर्गत असलेल्या आदिवासी मुलांच्या शासकीय वसतीगृहात दिनांक ११ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास रात्रीच्या भोजनात पाल आढळून आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले त्याअनुषंगाने दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृह, मुरबाड येथे दि.१०.०५.२०१९ रोजी संध्याकाळच्या जेवणाच्या वेळेस कुमार श्रावण वामन दरोडा, प्रथम वर्ष बी.ए. हा जेवणाचे ताट घेऊन रुम मध्ये जेवण करण्यासाठी गेला असता त्याच्या जेवणात पाल आढळून आल्याचे त्याने निदर्शनास आणले.

(२) व (३) शहापूर प्रकल्प कार्यालयातील प्रभारी आदिवासी विकास निरीक्षक, गृहपाल, आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृह, खर्डी व प्रभारी शिक्षण विस्तार अधिकारी यांनी चौकशी केली.

गृहपाल व रक्षक यांनी कर्तव्यात कसूर केल्यामुळे त्यांना निलंबीत करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोलवड (ता.जि. बुलढाणा) येथील आदिवासी मुला-मुलींच्या वसतिगृहाच्या बांधकामाबाबत

**(५१) * १३५४५० श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोलवड (ता.जि.बुलढाणा) येथील आदिवासी मुला-मुलींच्या नवीन वसतिगृहाला दिनांक ११ व १९ सप्टेंबर २०१८ रोजी वा त्यासुमारास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मान्यता प्रदान करण्यात येऊनही वसतिगृहाच्या बांधकामास सुरुवात करण्यात आलेली नसल्याने बुलढाणा जिल्ह्यातील आदिवासी मुला-मुलींच्या उच्च शिक्षणाचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, काय चौकशीत काय निष्पन्न झाले, व तद्‌नुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच, आदिवासी मुला-मुलींच्या वसतिगृहाच्या बांधकामास तात्काळ सुरुवात करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) हे खरे आहे. कोलवड (ता.जि.बुलढाणा) येथील आदिवासी मुली व मुलांच्या वसतिगृहाच्या इमारत बांधकामाच्या अंदाजपत्रकास अनुक्रमे दिनांक ११ व १९ सप्टेंबर २०१८ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(२), (३) व (४) कोलवड (ता.जि.बुलढाणा) आदिवासी शासकीय मुलींचे व मुलांचे दोन्ही वसतिगृहाच्या बांधकाम करावयाच्या जागेवर मातीची भारवाहक क्षमता चाचणी करण्यात आली असून पुढील निविदा प्रकिया सुरु करणेबाबतची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग, अमरावती यांच्याकडून सुरु आहे.

सद्यःस्थितीत आदिवासी शासकीय मुला-मुलींचे दोन्ही वसतिगृहे भाडयाच्या इमारतीत कार्यरत असून कोणत्याही पात्र विद्यार्थ्याला प्रवेशापासून वंचित ठेवण्यात आलेले नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिंदेवाही (जि.चंद्रपूर) तालुक्यातील आदिवासी क्षेत्रातील मोठ्या पुलाच्या बांधकामाबाबत

**(५२) * १३९२१३ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदेवाही (जि.चंद्रपुर) तालुक्यातील आदिवासी परिक्षेत्रातील कुकूडहेटी-कळमगाव-कोठा-मुरमाडी रस्त्यावरील इजिमा ४१ उमानदीवर मोठ्या पुलाचे बांधकाम करणे आणि सिंदेवाही-रामाळा-गडबोरी रस्त्यावर बोकारडोह नाल्यावर मोठ्या पुलाचे बांधकाम करण्यासाठी लोकप्रतिनिधीनी मा.आदिवासी मंत्री यांना वारंवार लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आदिवासी परिक्षेत्रातील गावे, तालुका, मुख्यालय व जिल्हा मुख्यालयासोबत जोडण्यासाठी या दोन्ही पुलांचे बांधकाम करणे गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी या दोन्ही पुलांचे बांधकाम करण्यासाठी आवश्यक निधी प्राप्त होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१), (२), (३) व (४) सिंदेवाही (जि.चंद्रपूर) तालुक्यातील आदिवासी परिक्षेत्रातील कुकूडहेटी-कळमगाव-कोटा-मुरमाडी रस्त्यावरील इजिमा ४१ उमानदीवर मोठ्या पुलाचे बांधकाम करणेबाबत मा. लोकप्रतिनिधींची निवदने प्राप्त झालेले आहे.

चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही तालुक्यातील सिंदेवाही रामाळा गडबोरी रस्त्यावर बोकारडोह नाल्यावर मोठया पुलाचे बांधकाम इजिमा १३० तसेच कळमगांव कोठा मुरमाडी रस्त्यावर उमा नदीवर मोठ्या पुलाचे बांधकाम करणे इजिमा ४१ या कामांना दि.१५.०३.२०१६ च्या शासन निर्णयान्वये अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, चंद्रपूर यांनी शिफारस केल्यानुसार अनुक्रमे रु.७.५० लक्ष व रु.९.०० लक्ष च्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. परंतू अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, चंद्रपूर यांनी ही कामे मंजूर केलेल्या अनुक्रमे रु.७.५० लक्ष व रु.९.०० लक्ष किमतीमध्ये करणे शक्य नसल्याचे कळवून सदर कामे वगळण्यासाठी प्रस्तावित केली होती. त्यानुसार सदर दोन्ही कामे वगळण्यात आलेली आहेत.

सिंदेवाही (जि.चंद्रपूर) तालुक्यातील सिंदेवाही-रामाळा-गडबोरी रस्त्यावरील बोकारडोह नाल्यावर मोठया पुलाचे बांधकाम करणे, इजिमा ४१ हे काम माहे नोव्हेंबर, २०१८ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये पुरवणी मागणीव्दारा अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यासाठी प्रस्तावित करण्यात आले होते. परंतू विभागाचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला होता. तसेच सन २०१९-२० च्या पावसाळी अधिवेशनाच्या विभागाच्या नवीन बाबी मध्ये सदर काम पुनश्च: प्रस्तावित करण्यात आले आहे.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील बारवी धरणग्रस्तांच्या नावे झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या गैरव्यवहाराबाबत

**(५३) * १३६२१५ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील बारवी धरणाची उंची वाढविल्यानंतर विस्थापित होणाऱ्या धरणग्रस्तांच्या नावे झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या गैरव्यवहाराची सखोल चौकशी करण्यासाठी धरणग्रस्तांनी तहसीलदार, मुरबाड यांचेकडे वारंवार मागणी केल्याचे दिनांक २४ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय, अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) बारवी प्रकल्पबाधित कुटुबांच्या घरांच्या मुल्यांकनाबाबत प्राप्त झालेल्या विविध तक्रारींनुसार चौकशी करणेकामी जिल्हाधिकारी, ठाणे यांचे कार्यालयामार्फत उप विभागीय अधिकारी, कल्याण उप विभाग यांच्या अध्यक्षतेखाली शिखर समिती नेमण्यात आली होती. सदरहू शिखर समितीमार्फत बारवी प्रकल्पबाधित गावांमध्ये घरांच्या फेर मुल्यांकनाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला होता. परंतु, गावकऱ्यांच्या तीव्र विरोधामुळे शिखर समितीमार्फत घरांचे फेर-मुल्यांकन करणे शक्य झाले नाही. त्यामुळे म.औ.वि. महामंडळाने सदर समिती रद्द करण्याची विनंती केली आहे.

मा.आमदार किसन कथोरे यांनी दिलल्या १४/१/२०१९ व ६/५/२०१९ च्या पत्रानुसार मऔवि महामंडळातर्फे बारवी धरण येत्या पावसाळयात पूर्ण क्षमेतेने भरण्याच्या दृष्टीने उर्वरित सर्व ठाणे जिल्हयाच्या पिण्याच्य पाण्याचा प्रश्न सोडविण्याकरीता उर्वरित बारवी प्रकल्प बाधितांना घरांच्या मुल्यांकनाची रक्कम अदा करण्याचा कार्यक्रम दि. ७ मार्च २०१९ रोजी पासून हाती घेण्यात आलेला असून तो प्रगतीपथावर आहे. तसेच घरांच्या मुल्यांकनाच्या रक्कमेबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींच्या संदर्भात चौकशी करण्यासाठी महामंडळाने अधीक्षक अभियंता (कोकण परिमंडळ) मऔविम, पनवेल यांची चौकशी अधिकारी म्हणून केली असून त्यांचेमार्फत चौकशी सुरु आहे.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.